रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## रत्नागिरीत दरड कोसळली

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील अस्तान-धनगरवाडी येथे भूस्खलन होऊन दरड कोसळल्याची घटना घडली. मुख्य रस्त्यावर दरड कोसळल्यानं बांदरी पट्ट्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. ही घटना सोमवारी (दि.१०) मध्यरात्री घडली आहे. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. गेल्या दोन दिवसांपासून खेड तालुक्यात जोरदार पाऊस सुरु आहे. या कोसळणाऱ्या पावसामुळं दरड कोसळली आहे. तीन वर्षांपूर्वी याच परिसरात घरांवर दरड कोसळल्याची घटना घडली होती. पान २ वर


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १२ जून २०२४

किंमत ४ ₹


## 'मोदींचे मंत्रिमंडळ नव्हे, 'परिवार मंडळ'

**नवी दिल्ली :** काँग्रेस हा घराणेशाहीवर चालणारा पक्ष आहे, घराणेशाही जगवायचं काम काँग्रेसकडून होतं. लांगुलचालन आणि घराणेशाहीवरुन मोदींनी अनेकदा राहुल गांधींना लक्ष्य केलं. मात्र, आता भाजपमध्येच कशी घराणेशाही आहे हे राहुल गांधींनी दाखवून दिले आहे. मोदींच्या मंत्रिमंडळात नव्याने शपथ घेतलेले तब्बल २० मंत्री घराणेशाहीतून आले असून, हे मंत्रिमंडळ नव्हे, तर 'परिवार मंडळ' आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. राजकीय वारसा असलेल्या नेत्यांमध्ये महाराष्ट्रातील रक्षा खडसे आणि पियुष गोयल पान २ वर

# कुंटेबागेतील प्रशासनाचा 'शिवतीर्थ'मध्ये रेकॉर्ड




| आविष्कार देसाई | रायगड |

**शिवतीर्थ इमारतीमधील रायगड जिल्हा परिषदेचा प्रशासकीय कारभार कुंटे बागेत स्थलांतरीत होऊन आता एक वर्षाचा कालावधी लोटला आहे. विविध महत्त्वांच्या कागदपत्रांची रेकॉर्ड रुम अद्यापही 'शिवतीर्थ'मध्येच ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासकीय कारभार हाकताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक होत आहे.**

### प्रशासकीय कारभार हाकताना होतेय दमछाक

**स्व. प्रभाकर पाटील यांच्या प्रयत्नातून**

**1978 साली 'शिवतीर्थ' इमारतीचे बांधकाम सुरु.** | **1982 साली इमारत बांधून पूर्ण.**

**2021 साली इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतरिम अहवाल तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना प्राप्त**

कुंटेबागेमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोयीसुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. मात्र, हे क्षेत्र सीआरझेड अंतर्गत येते. त्यामुळे या ठिकाणी साधी एक वीटसुद्धा लावता येत नाही. तसेच आवश्यक निधीदेखील उपलब्ध होत नसल्याने प्रशासनाची चांगलीच अडचण झाली आहे.

सन १९७८ साली रायगड जिल्हा परिषदेच्या 'शिवतीर्थ' इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. १९८२ साली ही इमारत बांधून तयार झाली होती. जिल्हा परिषदेचा कारभार एकाच इमारतीतून चालावा आणि सर्व विभाग एकाच इमारतीत कार्यरत असावेत, यासाठी तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांनी ही इमारत बांधून घेतली होती. तीन मजली इमारतीच्या बाहेर शिवकालीन शिल्पे साकारण्यात आली होती. तेव्हापासून जवळपास चाळीस वर्षे या इमारतीतून जिल्हा परिषदेचा कारभार चालविला जात होता. या इमारतीची पडझड होण्यास सुरुवात झाली होती. वारंवार डागडुजी करण्यावर करोडो रुपयांचा निधी खर्ची पडत होता.

ही बाब लक्षात घेऊन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील स्ट्रक्चरल अभियंता डॉ. सचिन पोरे यांनी इमारतीची पाहणी केली. यानंतर इमारत धोकादायक अवस्थेत असल्याचा अंतरिम अहवाल त्यांनी प्रशासनाला सादर केला होता. इमारतीच्या स्ट्रक्चरल पान २ वर

> **कुंटेबागेत कार्यालये स्थलांतरीत झाली असून, महत्त्वाचा रेकॉर्ड शिवतीर्थावरच आहे. कुंटेबाग येथे जागा नसल्याने तेथील रेकॉर्ड हलवण्यात आलेला नाही. कुंटेबागेत नव्याने रेकॉर्ड रुम, अध्यक्ष, उपाध्यक्ष, विविध विषय समित्यांच्या सभापतींचे दालन, सर्वसाधारण सभेसाठी सभागृह निर्माण करण्यासाठी तीन कोटी रुपयांचा निधी आहे. मात्र, सदरील क्षेत्र हे सीआरझेडमध्ये आहे. येथे बांधकाम करण्यावर मर्यादा येत आहेत. यातून लवकरच मार्ग काढण्यात येईल.**
> **– डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

# शासकीय दाखल्यांसाठी कार्यालयांचा फेरा



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात सध्या शालेय, महाविद्यालय कामासाठी विद्यार्थ्यांना शासकीय दाखल्यांची आवश्यकता आहे. मात्र, तहसील कार्यालय नवीन प्रशासकीय भवनमध्ये, तर शासकीय दाखल्यांसाठी आवश्यक असलेले मुद्रांक हे जुन्या कार्यालयाबाहेर मिळत आहे. दरम्यान, शासकीय दाखल्यांसाठी धावपळ करणाऱ्या पालकांना कर्जत शहरात दोन कार्यालयांचा फेरा मारावा लागत आहे.

कर्जत तहसील कार्यालय ब्रिटिश काळापासून टेकडीवर होते. मात्र, मागील महिन्यात कर्जत शहरातील पोलीस मैदान परिसरात बांधण्यात आलेल्या प्रशासकीय भवन येथे हलविण्यात आले आहे. त्या कार्यालयात सर्व कार्यालयांचे स्थलांतर करण्यात आले असून, कर्जत तहसील कार्यालय ज्या प्रशासकीय भवन येथे आहे. त्या ठिकाणी सेतू कार्यालयदेखील सुरू झाले असून, तेथील शासकीय कामे केली जात आहेत. सध्या दहावी आणि बारावीचे निकाल लागले असून, विद्यार्थ्यांना पान २ वर

> **मुद्रांक शुल्क विक्रेते यांनी आपली कार्यालय तहसील कार्यालयाच्या बाहेर सुरू करावीत.प्रशासकीय भवनाच्या आवारात कोणत्याही प्रकारचे कार्यालय दिले जाणार नाही. पण, समोर असलेल्या मोकळ्या जागेत कार्यालय उभे करण्यास आम्ही विरोध केलेला नाही.**
> **– डॉ. शीतल रसाळ, तहसीलदार**

**आजचा अग्रलेख**
**मित्रांशीच राजकारण**

**वे|ध|क**

## 'गोड बोलून काटा काढण्याचा डाव'

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज चौथा दिवस आहे. दरम्यान, चौथ्या दिवशी जरांगे पाटील यांची प्रकृती खालवल्याचं समोर आलं आहे. त्यांनी आज अंतरवाली सराटीमध्ये पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी संताप व्यक्त केला. तसेच सरकारवर देखील गंभीर आरोप केले आहेत. सरकारकडून गोड बोलून माझा काटा काढण्याचा डाव आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. माझं आमरण उपोषण सुरु आहे. एका बाजूला मराठा समाजाच्या मागण्या मान्य करण्यासाठी बैठका घेऊ, पान २ वर

## नीट परीक्षेत घोटाळा?

**नवी दिल्ली :** नीट परीक्षा घोटाळ्यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (दि. ११) सुनावणी झाली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून खुलासा मागवला आहे. राष्ट्रीय पात्रता तसेच प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप करण्यात आला असून, या परीक्षेच्या निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ही परीक्षा रद्द केली जावी, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलैला ठेवण्यात आली आहे.

# दोन आमदारांसाठी धोक्याची घंटा

| उरण | वार्ताहर |

नुकताच लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. त्यामध्ये मावळ लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे हॅट्रिक करून विजयी झाले आहेत. परंतु, मागील विधानसभा निवडणूक निकाल बघता, उरण व कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीचे आमदार असतानाही महाविकास आघाडीचे उमेदवार वाघेरे पाटील यांना आघाडी मिळाली असून, मताधिक्यात झालेली घट दोन्ही आमदारांसाठी धोक्याची घंटा असल्याचे बोलले जात आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात महायुतीचे आमदार असतानाही चार मतदारसंघात त्यांना मिळालेल्या आघाडीमुळे बारणे यांना हॅट्रिक करणे शक्य झाले आहे.



मात्र, मागील निवडणुकीत साथ दिलेल्या उरण व कर्जत मतदारसंघात पीछेहाट झाली आहे. या दोन्ही मतदारसंघात आघाडीचे वाघेरे पाटील यांना आघाडी मिळाली आहे.

मागील वेळी १ लाख ७० हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळवून विजयी झालेले बारणे यांना यावेळी ही आघाडी टिकविण्यात यश आले नाही. यंदा ९६ हजाराच्या मताधिक्याने बारणे निवडून आले आहेत. यावरून त्यांच्या मताधिक्यात घट झाल्याचे

- **महायुतीच्या मताधिक्यात मोठी घट**
- **सामान्य मतदार आघाडीच्या बाजूने उभा**

दिसून आले आहे. दरम्यान, घाटाखाली मतदारसंघातील पनवेल विधानसभा मतदार संघात बारणे यांना मागील निवडणुकीत ५४ हजारांची आघाडी मिळाली होती. यावेळी बारणे यांना ३१ हजारांची आघाडी मिळाली आहे. तर, भाजपाचे आमदार महेश बालदी यांच्या उरण विधानसभा मतदारसंघात आघाडीचे वाघेरे पाटील यांना १३ हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. तसेच आमदार महेंद्र थोरवे हे शिवसेनेचे असतानाही त्यांच्या कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या बारणे यांच्यापेक्षा आघाडीचे वाघेरे पाटील यांना १७ हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले आहे. ही आकडेवारी महायुतीच्या उमेदवारांसाठी निश्चितच टेन्शन वाढविणारी ठरणार आहे. शिवाय, भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांनी मूळ पक्षात फोडाफोडी करुन केलेली महायुती सर्वसामान्य जनतेला पटलेली नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत मतदारराजाने महायुतीला नाकारल्यामुळे त्याचा फटकाही बसला आहे.

उरण व कर्जत विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मिळालेली आघाडी ही आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत एकप्रकारे धोक्याची घंटा असल्याचे बोलले जात आहे.

# यंदाच्या पावसाळ्यात उरण बुडणार?

| उरण | वार्ताहर |

तालुक्याचा औद्योगिक विकास झपाट्याने होत चालला आहे. परंतु, हा औद्योगिक विकास होत असताना शहर व गावाचे गावपण हरवत चालले असल्याचे दिसत आहे. सर्वत्र मातीचा भराव करून वसाहती उभ्या राहात आहेत. तसेच समुद्रात मातीचा भराव करून प्रकल्प उभे राहात आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्याची बिकट समस्या उभी राहणार असल्याने तालुक्यातील अनेक गावांतील घरांमध्ये पाणी घुसण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचा निचरा न झाल्याने उरण बुडण्याची भीती व्यक्त होत आहे.

उरण परिसरात जेएनपीटीसह अन्य प्रकल्प भरसमुद्रात उभे राहिले आहेत, तर काही उभे करण्यासाठी



### तालुक्यातील गावांना धोका

समुद्रात भराव मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तसेच जेएनपीटी साडेबारा टक्के भूखंडासाठी दास्तान फाटा येथे भरावाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच तालुक्यातील मोकळ्या जागा धनदांडग्यांनी खरेदी करून शेतात मोठमोठे अनधिकृत यार्ड उभे केले आहेत. यामुळे पाण्याचा निचरा होणारे नैसर्गिक मार्गच भरावांच्या नावाखाली बंद करण्यात आल्याचे समजते. याचा अनुभव तालुक्यातील अनेक गावांना गेली अनेक वर्षांपासून घेत आहेत. परंतु पावसाळा गेल्यानंतर याचा विसर पडून पुन्हा पावसाळा सुरू झाल्यानंतर सर्वांना जाग येते.

आता रेल्वे सुरू झाली आहे. त्यानंतर याठिकाणी परप्रतियांची रहदारी, वास्तव्य मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. तसेच गावाभोवती ग्रामस्थांचे उभे राहणारे मोठमोठे बंगले यामुळे पावसाळ्यात या सर्वांचा सामना करताना सर्वांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. कारण, पडणाऱ्या मुसळधार पावसाचा निचरा होणारी नैसर्गिक नाले हे उद्ध्वस्त करण्यात आले आहे. तसेच शहरात व तालुक्यात मोकळी जागाच उरली नसल्याने पावसाचे पाणी पान २ वर

# कोकण, नाशिकसाठी काँग्रेस आग्रही

| मुंबई | प्रतिनिधी |

कोकण पदवीधर आणि नाशिकच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही आहे. मात्र, मुंबईची जागा काँग्रेस शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सोडण्यास तयार आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

लोकसभेप्रमाणेच ठाकरे गटाने विधान परिषदेच्या चारही जागा परस्पर घोषित केल्या केल्या आहेत. त्यामुळे काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी आहे. नाना पटोले यांनी याबाबत उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते परदेशी गेले असल्याने तो होऊ शकला नाही. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढवावी अशी काँग्रेसची भूमिका आहे, असे नाना पटोले म्हणाले. महाविकास आघाडी असताना घोषणा करण्याच्या आधी चर्चा केली पाहिजे होती, अशी काँग्रेसची भूमिका आहे. मुंबईतून विधानपरिषदेसाठी अर्ज भरलेले शिवसेना उबाठाचे उमेदवार ठाकरेंनी कायम ठेवावेत. मात्र कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक उमेदवार ठाकरेंनी मागे घ्यावेत, असा निरोप नाना पटोलेंनी उद्धव ठाकरेंना दिला आहे.


# मोदींचे 'लंगडे सरकार'

### शरद पवारांचे टीकास्त्र

| नगर | वृत्तसंस्था |

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली असली, तरी देशातील जनतेची त्यांना सहमती मिळाली आहे का, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी उपस्थित केला. केंद्र सरकारचा उल्लेख 'लंगडे सरकार' असा करत लोकशाहीतील मतदारांच्या ताकतीमुळे आता 'मोदी सरकार'ही राहिले नाही आणि 'मोदी गॅरंटी'ही राहिली नाही, अशी घणाघाती टीका त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात केली.

लोकसभा निवडणुकीतील यशाच्या पार्श्वभूमीवर नगरमध्ये पक्षाच्या वतीने सोमवारी विजयोत्सवी सभेचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाच्या नवनिर्वाचित आठ खासदारांसह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, तसेच पक्षाचे राज्यातील प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी पवार म्हणाले, की मोदी यांनी प्रचारात तारतम्य ठेवले नाही, मर्यादा पाळल्या नाहीत. अल्पसंख्याकांबद्दल द्वेष व्यक्त केला. माझा 'भटकता आत्मा' असा उल्लेख केला. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेला 'नकली शिवसेना' म्हणाले. सत्ता मिळण्याची शक्यता नसते तेव्हा अशी बेफाम वक्तव्ये केली जातात, असा टोला पवार यांनी लगावला. राम मंदिर उभारले याचा आनंदच आहे. मी तेथे गेलो तर मंदिरात जाईनही. परंतु मोदींनी चुकीचा वापर केल्याने अयोध्येतील जनतेने मोदींचा पराभव केला, असे पवार म्हणाले. यावेळी शेकापचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, शशिकांत शिंदे, प्राजक्त तनपुरे, उत्तम जानकर आदींचे भाषण झाले. पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी स्वागत केले.



पक्षाचे आठही खासदार हे महाराष्ट्राचे 'अष्टप्रधान' असल्याचा उल्लेख करत पवार यांनी हे खासदार महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताची जपणूक करतील, अशी ग्वाही दिली. महाराष्ट्रातील प्रश्न संसदेत जागरूकतेने मांडतील, असा विश्वास व्यक्त केला.

### पवारसाहेब महाराष्ट्राचा अभिमान

**शरद पवार हे महाराष्ट्राला मोठा अभिमान वाटवा असे नेते आहेत. त्या नेत्याचे तुम्ही खरे सैनिक आणि कार्यकर्ते आहात.**



**आणि, म्हणून याठिकाणी आम्ही लढतो, परंतु, संबंध ठेवण्याची जी परंपरा पवारसाहेबांची आहे, आणि गरीबांचा उद्धार करण्याची जी भूमिका त्यांनी पहिल्यापासून घेतली, ती आजतागाय जपली आहे. त्यांचे घराणे पहिले शेतकरी कामगार पक्षाचेच होते. आणि, त्यामुळे त्यांच्यावर ते विचार कायम राहिले आहेत, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले. संविधानाचे संरक्षण का करायला पाहिजे, ते बीडच्या जनतेने दाखवून दिल्याचे आ. पाटील म्हणाले. लोकसभेच्या निवडणुकीत ज्या ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले, त्यांच्या विरोधात येत्या अधिवेशनात आवाज उठविणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, आ. पाटील यांनी राष्ट्रवादीच्या नेतेमंडळींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांना वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.**

### मराठ्यांची पवारांना साद

**नाशिकमधील सकल मराठा समाजाचे समन्वयक करण गायकर यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन शरद पवारांनी मराठा समाजाचं नेतृत्व करावं, अशी मागणी केली आहे. मराठा समाजाच्या मागण्यांबाबत पवारांनी नेतृत्व करावे. समाजात शरद पवारांचे वेगळे स्थान आहे. तुम्ही ठरवलं तर समाज आरक्षणापासून वंचित राहू शकत नाही. मराठ्यांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन केले आहे.**

**मृगाच्या राखणीसाठी कोंबड्यांची कमतरता**

# पोलादपुरात नांगरणीच्या कामाला वेग

| पोलादपूर | प्रतिनिधी |

तालुक्यात रोहिणी नक्षत्रावर गेल्या गुरूवारपासून शेतकऱ्यांनी बियाणांचा पेरा करण्यास सुरूवात केली असून, पेऱ्याच्या वाफ्याभोवतीच्या शेतात नांगरणीच्या कामाने वेग धरल्याचे सर्वत्र दिसत आहे. दरम्यान, शेताच्या आणि देवांच्या राखणीसाठी मृग नक्षत्राची सुरूवात शुक्रवारी झाली असून, तालुक्यात रविवारी कोंबड्यांची प्रचंड कमतरता निर्माण झाल्याने चाकरमान्यांचा खोळंबा झाला आहे.

पोलादपूर तालुक्यामध्ये अवकाळी पावसापाठोपाठ मान्सूनची सुरूवात झाल्याने



पाऊस चांगलाच स्थिरावला आहे. शेतजमिनीमध्ये नांगरणी करून रोहिणी नक्षत्रावर गेल्या गुरूवारी पेरलेले भातबियाणे आता रूजून वाफा हिरवा होऊ लागला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीसाठी जमिनीची मशागत करताना पेऱ्याच्या वाफ्याभोवतीच्या शेतजमिनीवर नांगरणी सुरू केली आहे.

कोकणात मृग नक्षत्राच्या पंधरवड्यात देवाला आणि शेताला पक्षी धरून राखण देण्याची प्रथा असून, शुक्रवारी नक्षत्राचा प्रारंभ झाल्यानंतर रविवारी राखण देण्याच्या हेतूने असंख्य चाकरमानी मंडळी पोलादपूर तालुक्यातील आपापल्या गावांमध्ये सर्वसज्जतेसह दाखल झाले होते. मात्र, यादिवशी राखणीसाठी आरवते कोंबडे न मिळाल्याने चाकरमान्यांचा हिरमोड होऊन बुधवारपर्यंत मुक्काम लांबवावा लागला असून, चिकन सेंटरच्या दुकानांमध्ये कोंबडा मिळण्यासाठी अनेक चाकरमान्यांनी पान २ वर

# यंदाही पांडवकड्यावर बंदी कायम

| पनवेल | वार्ताहर |

पनवेलसह नवी मुंबईसारख्या सिमेंटच्या जंगलात खारघर शहरामधील नैसर्गिक पांडवकडा धबधबा पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. मुंबई, उपनगर, ते कल्याण, ठाणे तसेच रायगड जिल्ह्यातील पर्यटकांच्या पसंतीस उतरलेल्या या धबधब्यावर सुरक्षेच्या कारणावरून यंदाही वनखात्याने बंदी घातल्याने पर्यटकांचा हिरमोड होणार आहे.

खारघरमधील पांडवकडा धबधब्यावर दरवर्षी हजारो पर्यटक येतात. मात्र, अतिउत्साहाच्या भरात किंवा हलगर्जीपणामुळे अनेक वेळा याठिकाणी अपघात घडले आहेत आणि अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळेच वनखात्याने याठिकाणी पर्यटकांना येण्यास मज्जाव केला आहे. यंदाही पांडवकडा धबधब्यावर पर्यटकांना प्रवेश नाकारण्यात आला आहे.

**पर्यटकांचा हिरमोड**



### याठिकाणीही बंदी

**गाढेश्वर डॅम, गाढी नदी पात्राजवळील धबधबे याठिकाणी बंदी असणार आहे. दरवर्षी या ठिकाणांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त असतो. शहरातील महत्त्वाची ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदी घातली गेली असली तरी कर्नाळा अभयारण्यासारख्या प्रसिद्ध पर्यटनस्थळी पर्यटकांना निसर्ग पर्यटनाचा लाभ घेता येणार आहे.**

पांडवकडा धबधबा हा पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू असताना त्याठिकाणी प्रवेश नाकारणे हे चुकीचे असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. पांडवकडा धबधब्याला पर्यटन क्षेत्राचा दर्जा अद्याप मिळालेला नाही. वनविभागाने पर्यटकांसाठी प्रवेश बंद केल्यानेच याठिकाणच्या पर्यटन क्षेत्राला चालना कशी मिळणार, असा प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे. पर्यटकांचा जीव धोक्यात जाऊ नये म्हणून आम्ही हे पाऊल उचलले आहे. पर्यटकांनी नियमांचे उल्लंघन करू नये. याठिकाणी बंदोबस्तासाठी पोलिसांनादेखील पत्र लिहिणार असल्याची माहिती वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी देवीदास सोनावणे यांनी सांगितले.

# पाली भूतीवली धरणातून पाणीचोरी

## ■ पाटबंधारे विभागाचे होतेय दुर्लक्ष

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यात रेल्वे पट्ट्यात पाली भुतीवली लघुपाटबंधारे प्रकल्प आहे. या ठिकाणी धरणातील पाण्याची चोरी केली जात असल्याची बाब समोर आली असून, पाटबंधारे विभागाकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यान, या धरणात २००४ पासून पाणीसाठा असून, तेथील पाण्यावर शेती केली जाणार आहे. मात्र, शेतीसाठी पाणी सोडण्यासाठी कालवे बांधण्यात आले नसल्याने पाण्याची चोरी सुरू आहे.**



पाली भुतिवली हे धरण कर्जत-नेरळ रेल्वे पट्ट्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी बांधण्यात आले आहे. ३०० कोटी खर्च झालेल्या या धरणात पाणीसाठा आहे. मात्र, त्या पाण्यावर शेतकऱ्यांचा दुबार भातशेती करण्याचा अधिकार आहे. परंतु, त्या पाण्यावर काही खासगी लोक डल्ला मारत आहेत. धरणातील पाणी कोणत्याही प्रकारे उचलून ते वापरता येत नाही. परंतु, पाली भूतिवली धरणाच्या पाण्याची चोरी गेली अनेक वर्षे सुरू आहे. त्याबाबत पाटबंधारे विभाग यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. शासनाने पोद्दार बिल्डरला धरणाचे पाणी शेतीसाठी सोडले जात नाही तोवर देण्याची परवानगी दिली आहे. धरणाचे पाणी शेतीसाठी वापरण्यासाठी आवश्यक असलेले कालवे पाटबंधारे विभागाकडून तयार झालेले नाहीत. त्यामुळे २००४ पासून धरणाच्या जलाशयात पाणी साठूनदेखील त्याचा कोणताही वापर शेतीसाठी होत नाही. पाणी दिले जात नसल्याने शेतकऱ्यांना शेती करता येत नाही. पाटबंधारे खात्याने कालवे बांधण्याची कोणतीही कार्यवाही केली नाही आणि दुसरीकडे धरणातील पाणीचोरी केली जात असताना त्यावरदेखील कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

पाटबंधारे विभाग कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नसल्याने स्थाकि खासगी लोकांची हिम्मत वाढली असून, तब्बल पाच ते सहा लोकांकडून धरणातील पाणी चोरी करून उचलले जात आहे. त्या व्यक्तींकडून विजेच्या वाहिनीसोबत पाण्याची वाहिनी पाण्यात टाकण्यात आली आहे. काही शेकडो मीटर अंतरावरून जलवाहिन्या टाकण्यात आल्या असून, त्या जलवाहिनीमधून दररोज हजारो लीटर पाण्याची चोरी सुरू आहे. त्या चोरून नेलेल्या पाण्यावर स्विमिंग पूलमध्ये पाणी खळाळत आहे. या धरणाची अनेक कामे वर्षभर सुरू असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी हे सातत्याने धरणावर येत असतात. मात्र, पाटबंधारे विभागाला पाणी चोरून नेण्यासाठी टाकलेल्या जलवाहिन्या आजतागायत दिसून आलेल्या नाहीत. त्याचवेळी त्या जलवाहिनीसोबत विजेच्या वाहिनीदेखील पाण्यात टाकून ठेवल्या आहेत. त्यातून शॉर्ट सर्किट झाल्यास पाण्यामध्ये असलेल्या माशांचा दुर्दैवी मृत्यू होऊ शकतो. मात्र, राजकीय दबाव असल्याने पाटबंधारे विभागाकडून पाली भूतीवली धरणातील पाणीचोरी करणाऱ्यांवर आजवर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यावेळी शेतकरी पाण्याची वाट पाहात आहेत, तर खासगी लोक पाण्याची चोरी करीत आहेत, असा विरोधाभास या ठिकाणी दिसून येत आहे.

पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शिंदे यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांची कार्यालयात भेट झाली नाही आणि त्यांच्यासोबत मोबाईलवरदेखील बोलणे झाले नाही.

# नवी मुंबई विमानतळाचे नामकरण कधी?

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव ठाकरे सरकारने पारित केला. त्यापाठोपाठ एकनाथ शिंदे-फडणवीस सरकारनेदेखील दि.बां. च्या नावाने ठराव नव्याने पारित केला. मात्र, या घडामोडीला दोन वर्षांचा कालावधी होऊनही त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण कधी होईल, असा सवाल जनता करीत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास कोणाचे नाव लागते याकडे जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.

दि.बां. पाटील यांच्या नावासाठी येथील स्थानिक एकवटून लाखोंच्या संख्येने मोर्चे, निदर्शने तसेच आंदोलने केल्यानंतर शासनास नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नावाने स्वतंत्र ठराव करावा लागला होता. मात्र, नामकरणाबाबत शासन स्तरावर अंतिम निर्णय झाला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारने ठाकरे सरकारने दिबांच्या नावाचा घेतलेला नामकरणाचा ठराव रद्द करून तो पुन्हा नव्याने दि. १६ जुलै २०२२ रोजी घेतला होता. त्याला जवळपास दोन वर्षांचा अवधी होण्यास येऊनही नामकरणाचे घोंगडे आजतागायत भिजत पडले आहे.

लोकसभा निवडणुका होऊन पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा सरकार स्थापन झाले आहे. त्यामुळे आता तरी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते दि.बा. पाटील असे नामकरण कधी होईल का, असा सवालही या निमित्ताने उभा राहात आहे. विमानतळाला दि.बां. चे नाव द्यावे या भूमिकेवर येथील भूमिपुत्र आजही ठाम असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

# तेलंगवाडी रस्त्याला वनविभागाची आडकाठी

## ■ जुन्या रस्त्यावर डांबरीकरण, मग आता का नाही?
## ■ स्थानिकांचा सवाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायतीमधील जुन्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याकडून डांबरीकरण करू दिले जात नाही. त्यामुळे साळोख-ओलमन-चई-नांदगाव या पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून बनविण्यात आलेल्या रस्त्यावर आता वनविभाग पुन्हा डांबर टाकू देत नाही. त्याबाबद्दल स्थानिक आदिवासी बांधवांनी आणि या रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी वन खात्याच्या या मग्रुरीबद्दल संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, शासनाकडून रस्त्यासाठी निधी मंजूर झाला आहे. परंतु, वनविभागाच्या आठकाडीमुळे काम रखडले आहे.



१५ वर्षांपूर्वी पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून कर्जत तालुक्यातील सर्वाधिक लांबीचा रस्ता तयार करण्यात आला होता. वांगणी-पाषाणे-कळंब रस्त्यावरील साळोख गावातून हा रस्ता सुरु झाला होता. त्यानंतर पुढे भिकारवाडी एकनाथ वाडी असा कर्जत-मुरबाड रस्त्याला दुभाजून हा रस्ता ओलमन फाटा येथून ओलमन गावातून हा रस्ता पुढे तेलंगवाडी येथून कोतवाल वाडी असा पुढे गेला होता. कोतवाल वाडीपासून चई गावातून हा रस्ता गोरेवाडी आणि पुढे नांदगाव असा नेण्यात आला होता. त्यामुळे या रस्त्यामुळे स्थानिक आदिवासी आपला शेतमाल वांगणी रेल्वे स्थानक येथे नेऊ शकले होते. त्यामुळे हा रस्ता आदिवासी लोकांच्या उदरनिर्वाह तसेच व्यापार वाढण्यासाठी महत्त्वाचा ठरला होता. सातत्याने या रस्त्याने चांगली वाहतूक सुरु असायची आणि नंतर हा रस्ता खराब झाल्यावर मागील काही वर्षात या रस्त्यावर टप्प्या-टप्प्यात डांबरीकरण करण्यात आले होते. १५ वर्षांपूर्वी तेथे रस्ता करण्यात आला त्यावेळी वन विभाग कोणत्या गाढ झोपेत होता की त्यांना आपली जमीन आहे हे कळले नाही. त्यानंतर तीन-चार वर्षे या भागात वन विभागाकडून स्थानिक शेतकऱ्यांची अडवणूक सुरु केली आहे. दोन वर्षांपूर्वी या भागातील शेतकऱ्यांच्या शेतातील धान्य वनविभागाने मशीन फिरवून त्या पिकाची नासधूस केली होती. तर या भागातील आदिवासी लोकांना ते शेतकरी १०० वर्षे कसत असलेल्या जमिनीमध्ये जाण्यास, पिके घेण्यास विरोध करीत आहेत, असे आदिवासी बांधवांचे म्हणणे आहे.

# ‘धगधगते मणिपूर शांत करा’

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

सरकारने मणिपूर प्रश्नाला प्राधान्य द्यावे. तेथील हिंसाचार रोखण्याची गरज आहे. मणिपूर एक वर्षापासून शांततेची वाट पाहात आहे. हिंसाचार थांबवायला हवा आणि या मुद्द्याला प्राधान्य द्यायला हवे, अशा श्ब्दांत मोहन भागवत यांनी सरकारचे कान टोचले. आता संघाकडूनही हा मुद्दा उचलण्यात आल्याने आतातरी सरकार या गंभीर समस्येकडे लक्ष देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीयचा समारोप सोहळा सोमवारी (दि. १०) रेशीमबाग मैदानावर झाला. यावेळी शिक्षार्थींना संबोधित करताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बोलत होते.


## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे कुणे, ता. अलिबाग, जि.रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयश्री जगदिश नागे व विनायक उर्फ विनोद रामचंद्र नागे हे असून यांचेकडून विकत देण्याचे ठरविलेला असून सदर मिळकतीचा साठेकरार दि.०९/०५/२०२४ रोजी झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांना सदरच्या मिळकतीचा व्यवहार करण्याचा ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| कुणे ता. अलिबाग, जि.रायगड | ३४६ | जिरायत ०-४७-८० वरकस ०-०४-१० पो.ख. ०-०५-५० एकूण ०-५७-४० | १०.२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी श्री. जयश्री जगदिश नागे व विनायक उर्फ विनोद रामचंद्र नागे यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीची क्षेत्र ०-२०-०० आकार ३.९६ ही मिळकत सदरील नोटीसचा विषय आहे.

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : ११/०६/२०२४

**ॲड. नभेश भा. ठाकूर**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित करून त्याबाबत करार केला आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे झिराडपाडा, ता. अलिबाग येथील

| विद्यमान मालकांचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्रीमती मृणालीनी अशोक हरचंद्राय<br>श्रीमती मृदुला अशोक हरचंद्राय | ११५ (पुर्वीचा झिराड गट क्र.) | ०-९०-० पैकी ०-७४-० | ४.३० पैकी ३.५४ |
| | ५२ (पूर्वीचा झिराड गट क्र.२५६) | ४-२४-४० | ५२.२६ |
| | ११६ (पूर्वीचा झिराड गट क्र. ४४९) | ०-८०-४० पैकी ०-०९-० | ११.५०पैकी १.३७ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-११/०६/२०२४

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँके जवळ,
मु. पो. ता. अलिबाग, जि. रायगड.



## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पंकज शाम वाडकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| रेवदंडा ता. अलिबाग | ५३/१/क | बागायत ०-२८-३० | १६.९४ |

वर नमूद मिळकतीमधील एकूण क्षेत्र ०-०५-५० हे. आर. आकार ३.२९ रू.पै. मधील श्री. पंकज शाम वाडकर यांचे असलेले अविभाज्य हिश्याचे क्षेत्र

दिनांक :- ११/०६/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२


## पान १ वरून

## कुंटेबागेतील प्रशासनाचा, ‘शिवतीर्थ’मध्ये रेकॉर्ड

ऑडिटचा अंतरिम अहवाल ११ नोव्हेंबर २०२१ ला तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना प्राप्त झाला होता. या अहवालात जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत जुनी झाली असून, शासकीय काम करण्यास धोकादायक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर गेल्या वर्षी शिवतीर्थावरील कारभाराचे केंद्र अलिबाग येथील कुंटेबाग येथे हलवण्यात आले होते. काही विभाग हे अलिबाग पंचायत समिती, तसेच जिल्हा रुग्णालयाशेजारील इमारतीमध्ये स्तलांतरीत करण्यात आले होते. प्रशासनाला आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांचा रेकॉर्ड हा शिवतीर्थमध्येच ठेवण्यात आला होता.

गेल्या वर्षभरापासून त्या-त्या ठिकाणाहून कारभाराचा गाडा हाकण्यात येत आहे. परंतु, कोणत्याही महत्त्वाच्या दस्तऐवजाची आवश्यकता लागल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना थेट शिवतीर्थाकडील रेकॉर्ड रुमकडे धाव घ्यावी लागत आहे. त्यामुळे प्रत्येक वेळी रेकॉर्ड आणणे आणि पुन्हा त्याच ठिकाणी घेऊन जाणे यामध्ये सर्वांचीच दमछाक होत आहे. त्याचप्रमाणे अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे असल्याने गहाळ झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

## कार्यालयांचा फेरा

शासकीय दाखल्यांचे गरज आहे. त्यासाठी तालुक्यातील सर्व पालक आपल्या पाल्यांना घेऊन कर्जत तहसील कार्यालय येथे येत आहेत. मात्र, शासकीय दाखल्यांसाठी लागणारे मुद्रांक पेपर हे तहसील कार्यालय असलेल्या प्रशासकीय भवन येथे मिळत नाहीत. त्यामुळे मुद्रांक पेपर मिळविण्यासाठी तसेच त्यावर मजकूर टाईप करुन घेण्यासाठी पालकांना चालत-चालत १५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या जुन्या तहसील कार्यालयात जावे लागत आहे. त्यामुळे एखाद्या कामासाठी जे तीन तास लागत होते, त्या एका दाखल्याच्या कामासाठी दिवस जात आहे. कर्जत तहसील कार्यालय नवीन ठिकाणी आणि अर्ज टाईप करण्याची कामे जुन्या कार्यालयाबाहेर आहेत. त्यामुळे पालक वर्गात प्रचंड संताप असून, कर्जत तहसील कार्यालयाच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे.

नवीन प्रशासकीय भवन येथे जुने तहसील कार्यालय हलविण्यात आले असून, त्यावेळी शासनाच्या मुद्रांक विभागाचे मुद्रांक शुल्क विक्रेते यांची दुकाने हलविण्यात आली नाहीत. मुद्रांक शुल्क हे विकण्याचा परवाना शासनाच्या विभागाने दिला असून, रायगड जिल्ह्याचे मुद्रांक शुल्क अधिकारी यांचे कार्यालयदेखील जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. असे असताना कर्जत येथे मुद्रांक विकणारे यांना नवीन प्रशासकीय भवनमध्ये जागा देण्यात आली नाही. मुद्रांक पेपरची प्रत्येक शासकीय कामासाठी आवश्यकता भासत असते. त्यात कर्जत तहसील कार्यालयात विविध प्रकारचे दाखले मिळविण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांची गर्दी आहे.शाळा आणि महाविद्यालय प्रवेश घेण्यासाठी शासकीय दाखले महत्त्वाचे असून, ते दाखले घेण्यासाठी पालक कर्जत तहसील कार्यालयात पोहोचत आहेत. मात्र, त्यांना प्रशासकीय भवनमधील सेतू कार्यालयात केवळ दाखल्यांचे अर्ज मिळतात. मात्र, त्या अर्जासोबत लावावे लागणारे मुद्रांक पेपर हे कर्जत तहसील कार्यालयात उपलब्ध होत नाही.

ते मुद्रांक खरेदी करण्यासाठी जुन्या तहसील कार्यालयात म्हणजे टेकडीवरील कार्यालयात जावे लागत आहे. ही सर्व कामे करण्यासाठी पालकांना मोठा आर्थिक भुर्दंड रिक्षा प्रवासासाठी लागत आहे. त्यामुळे पालक वर्गात संतापची भावना असून, रायगड जिल्हाधिकारी यांनी या प्रकाराची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी मनसेच्या कर्जत शहर महिला अध्यक्ष वैशाली कांबळे यांनी केली आहे. रायगड जिल्हाधिकारी यांनी मुद्रांक शुल्क विभागाला नवीन प्रशासकीय भवन मध्ये जागा उपलब्ध करून द्यावी आणि पालकांची धावपळ थांबवावी, अशी मागणी केली आहे. शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास पालकवर्गातून मोठे आंदोलन उभे राहू शकते, कारण तालुक्याच्या शेवटच्या टोकावरून पालक आपल्या पाल्याचे शासकीय दाखले मिळविण्यासाठी येत असतात. त्यांना दाखले मिळत नसल्याने पालकवर्ग संतप्त असल्याची माहिती वैशाली कांबळे यांच्याकडून देण्यात आली आहे.

## यंदाच्या पावसाळ्यात उरण बुडणार?

जाणार कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यात गावाभोवती झालेला भराव उंच झाला आहे, तर गावांतील घरे खाली गेली आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी हे शहरातील व तालुक्यातील अनेक गावांतील घरांमध्ये घुसून उरण बुडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा अनुभव तालुक्यातील काही गावांना येत आहे. यावर्षी यात वाढ होण्याची शक्यता असल्याने जनतेने व प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक आहे.

## पोलादपुरात नांगरणीच्या कामाला वेग

आगाऊ रक्कम देऊन आपापला पक्षी आरक्षित केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. गावा-गावांतील कोंबडे रविवारपासून महागले असून, आरवणाऱ्या गावठी कोंबड्याची किंमत ७०० ते १२०० रूपयांपर्यंत पोहोचल्याने आता पोल्ट्रीतील बारामती आणि सुरती कोंबडादेखील चालवून घेणाऱ्या चाकरमान्यांना गावातील वृद्ध मंडळींनी कोंबडे पाळायला हवे असल्याचे साक्षात्कारदेखील झाल्याचे अनेकांनी सांगितले.

मृग नक्षत्रावर पावसाचा जोर रोज कायम असून, वातावरणातील गारव्यावर शेताची राखण देऊन कोंबड्याची सागोती नैवेद्य म्हणून भक्षण करण्यासाठीचा इलाज बुधवारी तसेच येत्या शुक्रवार व रविवारी मोठ्या प्रमाणावर बिगरवारकरी शेतकरी मंडळींकडून केला जाणार आहे.

## गोड बोलून काटा काढण्याचा डाव

अशी चर्चा सरकारकडून सुरु आहे. मात्र, अशा चर्चा करून सरकारकडून गोड बोलून माझा काटा काढण्याचा डाव आहे, असा अंदाज दिसतो, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. जरांगे यांनी आज अंतरवाली सराटीमध्ये पत्रकार परिषदेत त्यांनी हा आरोप केला आहे.

सरकारकडून माझ्या आंदोलनाची दखल घेतली जात नसून, केवळ मला खेळवणं सुरु आहे. जर या आंदोलनाची दखल सरकारनं घेतली नाही, तर मराठे यांना चांगला हिसका दाखवतील, असा इशाराही जरांगे यांनी यावेळी दिला आहे. दरम्यान, जरांगे पाटील डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरही त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे.

## ‘मोदींचे मंत्रिमंडळ नव्हे, ‘परिवार मंडळ’


यांच्यासह एच.डी. कुमारस्वामी, ज्योतिरादित्य शिंदे, किरण रिजेजू, जयंत चौधरी, चिराग पासवान, जेपी नड्डा, कमलेश पासवान, रामनाथ ठाकूर, राममोहन नायडू, जितीन प्रसादा, शंतनू ठाकूर, राव इंद्रजीत सिंग, किर्ती वर्धन सिंग, विरेंद्रकुमार खाटीक, रवणीनत सिंग बिट्टू, धर्मेंद्र प्रधान, अनुप्रिया पटेल, अन्नपूर्णा देवी यांची नावे असून, या सर्व मंत्र्यांचे वडिल किंवा कुटुंबातील सदस्य हे यापूर्वी मंत्री राहिले आहेत, असेही राहुल गांधींनी सांगितले.

## रत्नागिरीत दरड कोसळली

यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळं रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड तालुक्यातील १८ गाव बांदरी पट्ट्यात असणाऱ्या अस्तान- धनगरवाडी या ठिकाणी डोंगरावर भूस्खलन होऊन मोठी दरड कोसळली आहे. ही दरड मुख्य रस्त्यावरती सोमवारी मध्यरात्री कोसळली. त्यानंतर या ठिकाणची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## TENDER NOTICE

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BILLING/EE/GOREGAON/MHD/T-05/2024 | Monthly Meter Reading of LT consumers up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered UrbanLT consumers coming under Municipal Corporation , Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.)under **Mahad sub** division to be done using Mahavitaran Mobile App, IR/RF HHUs,Bill Printing and Bill distribution upto consumer /consumer premises for three financial years. | 219 | 73150/- | 5000+18 %GST =5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Mahadiscom website from Dt. 12.06.2024 to Dt. 27.06.2024. Similarly Submission of Bid is up to Dt. 27.06.2024 till 15.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl.Executive Engineer, Tel No. 9029102659 M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer Goregaon Division**



## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे वढाव बुद्रुक, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद वर्णनाची जमिन मिळकत, श्री. सुरेश माया तळवलकर, श्रीमती रसिका रमेश तळवलकर, श्री. जयेश रमेश तळवलकर व श्री. तेजस रमेश तळवलकर, सर्व राहणार वढाव बुद्रुक, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी खाली नमूद मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या संदर्भात सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान करार स्वाक्षरीत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव बुद्रुक, ता. अलिबाग | २२९ | ०-५५-४० ०-०९-९० पो.ख. ०-६५-३० एकूण | ११-८८ |

सदरील मिळकतीपैकी उत्तर-पश्चिम दिशेकडील ०-१६-०० (हे.आर)जमिन मिळकत.

सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ११/०६/२०२४.

सही/-
**(ॲड. सतिश शंकर पाटील)**
ऑफीस ओ/१, हिराबाग सीएचएस,
टिळक रोड, अलिबाग, ता. अलिबाग,
जि. रायगड-४०२ २०१.
खरेदीदाराचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

**निवडक**

## ट्रक चालकाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रक चालक शहादेव किसन आंधळे (३९) याने त्यांच्या ताब्यातील ट्रक घेऊन जेएनपीटी ते पळस्पे मार्गावरुन पनवेलच्या दिशेने जात असताना त्यावेळी असलेल्या अंधारामुळे पुष्पकनगर जवळ रस्त्यालगत उभा ट्रेलर त्यांच्या लक्षात न आल्याने त्यांचा ट्रक ट्रेलरवर जाऊन धडकला. या अपघातात शहादेव आंधळे हे गंभीररित्या जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्रेमसंबंधातून फसवणूक

**पनवेल :** प्रेमसंबंध जोडून लग्न करतो असे सांगून एका महिलेबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी वारंवार जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवल्याप्रकरणी एका इसमा विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. यातील आरोपीचे नाव मोसिन मुजावर (३६) असून २९ वर्षीय महिलेबरोबर ओळख करून तिच्यासोबत प्रेमसंबंध जोडून लग्न करतो असे सांगून तिची फसवणूक करून जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुचाकीचा अपघात

**रोहा :** तालुक्यातील शेडसई गावाजवळ दुचाकी (एमएच-०६-सीजे-०८२६) चालक हा चणेरा ते रोहा जात असताना रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात दुचाकी चालवुन रस्त्याच्या बाजूला असलेले माईल स्टोन दगडाला धडकला. या अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार अविनाश शिद हे करीत आहेत.

## दुचाकी चालकाचा मृत्यू

**महाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील साहीलनगर ते गांधारापाले दरम्यान बौध्दविहार येथे दुचाकी (एमएच-०४-एमबी-९२१५) चालक मुंबईकडून महाडकडे जात असताना अतिवेगाने गाडी चालवत रस्त्याच्या परीस्थितीचा अंदाज न आल्याने येथील दुभाजकाला धडकून अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालकाचा मृत्यू झाला असून मागच्या सीटवर बसलेला गंभीर जखमी झाला आहे. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वायरच्या चोरीचा प्रयत्न

**माणगाव :** येथील घोटवळ येथे इंडसटेलिकॉम कंपनीच्या टॉवरमधील वायरची चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी तक्रारदार यांच्या ताब्यात असलेल्या इंडस टेलिकॉम कंपनीच्या टॉवरमधील एमसीयु व ओडीसीचा लोखंडी दरवाजा उघडुन वायरची चोरी करण्याचा प्रयत्न करताना आरोपी सापडला. या आरोपीला अटक करण्यात आली असून माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोह दर्शन दोडकुलकर करीत आहेत.

# कासाडी नदीच्या प्रदूषणात वाढ

## ■ प्रशासनाचा नागरिकांच्या जिवाशी खेळ

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

**तळोजा औद्योगिक विभागातील कारखान्यातून सोडण्यात आलेल्या विघातक विषारी पाण्याने कासाडी नदीला लाल रंग आला आहे. या बेसुमार वाढत्या विघातक प्रदूषणाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांचे जीवनच उध्वस्त झाले आहे. त्यांना अनेक आजारांचा सामना करावा लगत आहे. या विषारी प्रदूषणापासून नागरिकांची सुटका होईल का, की प्रशासन स्थानिकांचा जीव घेण्यावर बसले आहे, असा संतप्त सवाल काँग्रेसचे पनवेल जिल्हा पर्यावरण अध्यक्ष सुरेश पाटील यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केला आहे.**



तळोजा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तळोजा औद्योगिक विकास मंडळाकडे गेल्यापासून कासाडी नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी बेलापूर व तळोजा औद्योगिक विकास मंडळ यांच्यामधून विस्तव जात नसल्याने याची किंमत येथील स्थानिक नागरिकांना मोजावी लागत आहे. प्रदूषण करणाऱ्या कारखान्याकडून दोन्ही आस्थापना हप्ते वसूल करत असल्याने येथील प्रदूषण कमी होण्याऐवजी वाढत असल्याचा गंभीर आरोप सुरेश पाटील यांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून रात्री कारखान्यातून विघातक पाणी सोडण्यात येत आहे. दीपक कंपनी ते वलप गणेशनगर विसर्जन घाट दरम्यानचे कासाडी नदीचे पाणी लालच लाल झाले आहे. याची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळ नवी मुंबई व तळोजा औद्योगिक विकास मंडळ यांना देण्यात आली असता कासाडी नदीच्या पाण्याचे नमुने घेण्यात आले. पण त्यावर अद्याप कोणतीही कारवाई न करता येथे आर्थिक हितसंबंध जपले गेले. त्यामुळे येथील कंपन्यांना कासाडी नदीत विषारी पाणी सोडण्याची मुभा देण्यात आली आहे.

आज कासाडी नदीचे प्रदुषीत पाणी जमिनीत मुरले जाऊन नागरिकांच्या पिण्यात येऊन त्यांना आस्थमा, छातीत जळजळ, फुफुसाचे आजार जडले आहेत. तर, लहान मुलांची वाढ खुंटत असून अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व तळोजा औद्योगिक विकास मंडळाकडून न्यायालयाचे आवमान करताना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये सर्रासपणे रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच कासाडी नदीत, मोकळ्या भुखंडावर ओतले जात आहे. असे असताना तळोजा पोलिसांपासून प्रदुषण नियंत्रक मंडळ, एमआयडीसी, प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी तसेच पनवेल महापालिका प्रशासन डोळ्यावर कातडे ओढून मांजरीसारखे गप्प बसले आहे.

तळोजा सांडपाणी प्रकल्पाला वाहून आणणाऱ्या वाहिन्या दिशाहीन व्यवस्थापनामुळे टाकण्यात आल्याने त्या जागोजागी फुटल्या आहेत. या वाहिन्यांचे चेंबर भरल्याने कारखान्यातील विघातक पाणी थेट कासाडी नदीत जात आहे. नवीन टाकलेल्या वाहिन्या आणि त्याचे भरलेले चेंबर साफ करण्यासाठी एमआयडीसीने भागीदारीत ठेकेदार नेमल्याने त्यावर दर महिन्याला लाखो रुपये खर्च केला जात आहे, असा गंभीर आरोप सुरेश पाटील यांनी केला आहे.

# मूनवली येथील बंधाऱ्याची स्वच्छता



। सोगाव । वार्ताहर ।

सामाजिक कार्यात नेहमीच कौतुकास्पद कामगिरी करण्यात अग्रेसर असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील मूनवली येथील सचिन घाडी मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी रामधरणेश्वर डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या बंधाऱ्याची उत्स्फूर्तपणे स्वच्छता केली.

या बंधाऱ्याच्या आतील भागात व बाहेरील परिसरात मोठ्या प्राणात झाडेझुडपे व गवत वाढले होते. तसेच, वाहून आलेला कचरा देखील मोठ्या प्रमाणात साचला होता. यामुळे येथे येणाऱ्या पावसाळी पर्यटकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. हि बाब मूनवली येथील सचिन घाडी व मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर रविवारी (दि.९) बंधाऱ्याच्या आतील भागातील व बाहेरील परिसरातील भागात वाढलेली झाडेझुडपे, वाढलेले गवत, वाहून आलेला कचरा याची उत्स्फूर्तपणे स्वच्छता करत योग्य ती विल्हेवाट लावली. या बंधाऱ्याच्या काही अंशी केलेल्या स्वच्छतेमुळे याठिकाणी येणाऱ्या गावातील व पंचक्रोशीतील तसेच पावसाळी पर्यटकांची होणारी गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल सचिन घाडी मित्रमंडळाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

या स्वच्छता अभियानात निकेश अनमाने, सतिश घाडी, आत्माराम पंडम, प्रसाद मसुरकर, प्रतिक अनमाने, सुयोग अनमाने, संजय अनमाने, गौरव मोंढे, अशोक मोंढे, रोशन अनमाने, गितेश ठकरुळ, अक्षय नागावकर, जयेश ठकरुळ, सार्थक अनमाने, पियुष घाडी, सोहम निकम, तुषार मोंढे, अभिषेक जुईकर व इतर कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



● शाळा सुरू होणार असल्याने शालोपयोगी वस्तू खरेदीसाठी अलिबाग मधील दुकानात पालकांची गर्दी होत आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

# कृषी विषयक कार्यक्रम संपन्न

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथे संपन्न झालेल्या कृषी विषयक कार्यक्रमाला शेतकरी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालुका कृषी कार्यालयांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात कृषी सहायिका पल्लवी उबाळे यांनी उपस्थित शेतकरी वर्गाला बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच रविंद्र मरवडे, राम मरवडे, वसंत मरवडे, शंकर मरवडे, रामचंद्र बामणे, रामचंद्र मरवडे, प्रशांत नागावकर, अनंता मरवडे, काशिराम गायकर, सुभाष बामणे, सुनील मरवडे, मारूती बामणे, राजेंद्र मरवडे, वामण नागावकर, मोरेश्वर मरवडे, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात कृषी सहायिका पल्लवी उबाळे यांनी खरिप हंगामातील विविध पीक लागवडीची तयारी, मशागत, शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवनवीन बी बियाणे याबाबत मार्गदर्शन केले.



# मुरुड तालुक्यात पावसाची हजेरी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करायला लावणाऱ्या पावसाने अखेर मुरुड शहरासह तालुक्यात हजेरी लावली आहे. गेल्या दोन दिवसांपासून रात्रीच्या वेळी शहरात विजेच्या कडकडाटां सह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली असुन १५४ मि.मि. नोंद झाली आहे. यामुळे मुरूडकरांना उकाड्यातून दिलासा मिळाला आहे. तर, शेतकरी ही सुखावला आहे. हा पाऊस सतत पडत राहिला तर लवकरच पेरणीला सुरुवात होईल. विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे तीव्र पाणी टंचाईची समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

# सलमान खान सोबत लग्नाचा हट्ट

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

सलमान खान सोबत लग्न करण्याच्या हट्ट धरलेली २५ वर्षीय तरुणी सलमान खानच्या पनवेल जवळील फार्म हाऊस जवळ पोहोचली. पोलिसांनी या तरूणीला समजावल्यानंतर तिला जवळच्या आश्रमामध्ये नेण्यात आले. त्यानंतर तिला कामोठ्यातील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या तरुणीचे एका तरुणासोबत प्रेम संबंध होते. त्या तरुणाने तिला लग्नासाठी नकार दिला. याचा तिला धक्का बसला व त्यानंतर तिने सलमान खान सोबत लग्न करायचे आहे असे बोलून पनवेल गाठले. ही तरुणी यापूर्वी पाच वर्षे दिल्लीत राहायची. यापूर्वी ती तीन वेळा घराबाहेर गेली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ती मानसिक रुग्ण आहे. दि.२२ मे रोजी ती सलमान खानसोबत लग्न करायचे आहे असा चंग बांधून पनवेल तालुक्यातील सलमान खानच्या फार्म हाऊसच्या दिशेने निघाली. नेरे परिसरात आल्यानंतर तिने गोंधळ घालण्यास सुरुवात केली. याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तिची चौकशी केली त्यानंतर तिने सलमान खान सोबत लग्न करायचे आहे, असे सांगितले. ती मानसिक रुग्ण असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी काही काळाकरता तिला जवळच्या आश्रमात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर तिच्यावर सध्या एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

# जिंदल रुग्णालयात शिबिरांचे आयोजन

। सुकेळी । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील येथील बी.सी.जिंदल रुग्णालयाच्यावतीने दि.१३ व २० जुन रोजी दोन वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१३ जुन रोजी शरीरातील रक्ताचे प्रमाण व दि.२० जुन रोजी रक्तातील साखरेचे प्रमाण असे दोन शिबीर होणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरीकांची रक्ताची तपासणी करुन योग्य असे मार्गदर्शन डॉ. गोपाळ परमार करणार आहेत.

तसेच, जिंदल रुग्णालयाची सेवा ही गोरगरीबांच्या सेवेसाठी २४ तास सुरू करण्यात आली असुन विविध आजारांवरती तज्ज्ञ डॉक्टरांच्या भेटी देखिल सुरु करण्यात आल्या आहेत. यामध्ये हृदयरोग तज्ज्ञ डॉ. समिर वनकर, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. रोहीणी खेरा भट्ट, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. शरिफ दुदेकुला, डॉ. नितिश अरोरा, डॉ. आर. जे. गड्डम, मुत्र रोग तज्ज्ञ डॉ. विकास बिशे, बालरोग तज्ज्ञ डॉ. आनंद वागळे, दंतरोग तज्ज्ञ डॉ. संकेत म्हात्रे, कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. हर्ष गुजराथी, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. मंदार माने आदि डॉक्टरांच्या भेटी जिंदल रुग्णालयात सुरु करण्यात आल्या आहेत. तरी या सर्व सुविधांचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. गोपाळ परमार यांनी केले आहे.

# ‘एस टन’ बनला अपघाताचा केंद्रबिंदू

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ माथेरान घाट रस्त्यातील जुमापट्टी येथील ‘एस टन’ हा अपघाताला निमंत्रण ठरत आहे. काही दिवसांपूर्वी याच वळणावर मोटारसायकलचा अपघात घडून एका तरुणाचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच रात्रीच्या सुमारास उल्हासनगर येथून आलेल्या पर्यटकांच्या वाहनास अपघात घडला. सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवितहानी झालेली नसली तरी वाहनाचे नुकसान झाले आहे. तरी या वळणावर वाहन चालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे बनले.



माथेरान येथे हजारोच्या संख्येने पर्यटक दिवसाकाठी भेट देत असतात. माथेरानला एक दिवसाची सुट्टी घालवण्यासाठी सर्वाधिक पर्यटक आपल्या खाजगी वाहनाने येने पसंत करतात. परंतु, माथेरान घाटातील जुमापट्टी येथील एस टन या नावाने ओळखले जाणारे ठिकाण हे वाहन चालकांसाठी अपघाताचा केंद्र बिंदू बनला असल्याचे चित्र आहे. उल्हासनगर येथील पर्यटक माथेरान फिरून झाल्यानंतर सोमवारी (दि.१०) ईर्टिगा कार (एमएच-०५-डीएच-४१२०) ने माथेरान घाट रस्ता उतरत होते. दरम्यान, या पर्यटकांची कार घाटातील अवघड वळण समजले जाणारे जुमापट्टी येथील एस टन या वळणावर आले असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार सुरक्षा कठड्याला जाऊन धडकून समोरील झाडाला ठोकली. दैव बलवत्तर म्हणून या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही.

# विकास चित्ते यांचा सन्मान

। नेरळ । प्रतिनिधी ।

माउंटन स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या माध्यमातून राज्यातील गिर्यारोहकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्जत येथील गिर्यारोहक विकास चित्ते यांचा नवीन गिर्यारोहक घडविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.



माऊंटन स्पोर्ट्स अकॅडमी महाराष्ट्र या गिर्यारोहण क्षेत्रातील अग्रगण्य व नामांकित संस्थेकडून शिवशंभो युवा हायकर्स कर्जत संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते यांचा गिर्यारोहण क्षेत्रातील प्रदिर्घ कारकिर्दी बद्दल आणि कर्जत परिसरात गिर्यारोहण हा धाडसी प्रकार रुजवून अनेक गिर्यारोहक तयार केल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. आयुष्यातील उमेदीचा काळ गिर्यारोहण, भटकंती आणि सामाजिक दृष्टी ठेवून या क्षेत्रात विकास चित्ते यांनी काम केले. दिग्गज गिर्यारोहक ते तरुण पिढीतील गिर्यारोहक यांना एकत्र आणून संवाद घडवून आणणे. या क्षेत्रातील संबंधित सर्वांना एक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. अशी अनेक प्रेरणादायी कामे त्यांनी केली आहेत.

# गोल्डन मॅनने घेतले हळदीचे पीक

**श्रीवर्धन :** कोकणातील शेतकऱ्यांनी भातशेतीसोबतच इतर नगदी पिकांचे उत्पादन घेतले तर खेडेगाव सोडून शहरांकडे जाण्याची वेळच येणार नाही, असे प्रगतीशील शेतकरी रामदास सिताराम सकपाळ यांनी सांगीतले. फौजदार वाडी येथील सकपाळ यांनी गतवर्षी ५०० किलो हळद बियाणे वाईहून आणून लावले होते. तर, सर्वांना नगदी पिके घेण्याची सवय लागावी म्हणून त्यांनी २५० किलो हळद इतर शेतकऱ्यांना विनामूल्य भेट म्हणून दिली. अंगावर सोने घालून न जगता सोनेरी हळद पिकविणारे हे खऱ्या अर्थाने ‘गोल्डन मॅन’ असल्याचे बोलले जात आहे.



# मासळीचे भाव कडाडले

## मासेमारी बंदीमुळे आवक घटली

*। उरण । वार्ताहर ।*

***दि. १ जुनपासुन ३१ जुलैपर्यंत शासनाच्या खोल समुद्रातील तब्बल ६१ दिवसांच्या पावसाळी मासेमारी बंदीच्या आदेशानंतर मासळीची आवक घटली आहे. यामुळे मासळीचे भाव चांगलेच कडाडले आहेत.***

*पश्चिम तटवर्ती समुद्री क्षेत्रातील मासेमारी बंदीचे आदेश जारी केले आहेत. यामुळे हजारो मच्छीमार बोटींनी करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड, खोपटा, वशेणी, गव्हाण आदि विविध खाडीतील बंदरात नांगर टाकून विसावल्या आहेत. मासेमारी बंदी दरम्यान दररोज बाजारात येणाऱ्या विविध प्रकारच्या मासळीची आवक पुरती घटली आहे. त्यामुळे बाजारात मासळीचा तुटवडा जाणवत आहे.*

*पापलेट, घोळ, जिताडा, माकूळ, कलेट, सुरमई, रावस, हलवा आदि चांगल्या प्रतीची मासळी बाजारात दिसेनाशी झाली आहे. आणि मिळालीच तर या मासळीचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेरचे आहेत. त्यामुळे येथील स्थानिक मच्छीमारांकडून डोल, वावरी, खांदा, फग, वाणे आदी प्रकारातून पकडून बाजारात येणाऱ्या बोंबील, मांदेली, चिवणी, वाकटी, बांगडे, निवट्या, कालवं, भिलजी, वाम आदि दुय्यम प्रकारच्या मासळीवर समाधान मानावे लागत आहे. मासळीच्या तुटवड्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही मासळीचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे मासळी खवय्यांची चांगलीच पंचाईत झाली आहे. पावसाळी मासेमारी बंदीची मुदत संपुष्टात येईपर्यंत आणि मासळीची आवक वाढीपर्यंत मासळीचे भाव सामान्यांच्या आवाक्यात येणं अवघडच असल्याच्या प्रतिक्रिया मासळी व्यावसायिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.*

| मासळी - बंदी आधीचे दर - बंदी नंतरचे दर |
| --- |
| पापलेट (किलो)-८०० ते १०००-१००० ते १५०० |
| सुरमई (किलो)-७०० ते ८००-८०० ते १००० |
| कोळंबी (किलो)-४५० ते ५५०-७०० ते ८०० |
| रिबनफिश (नग)-७५ ते ८०-१५० ते २०० |
| हलवा (किलो)-४००-५५० ते ६५० |
| माकुळ (नग)-५०० ते ७००-८००च्या पुढे |
| रावस (किलो)-६०० ते ८००-८०० ते १००० |
| जिताडा (किलो)-१०००-१२०० |
| बांगडा (३ नग)-१०० ते १५०-२०० |

# सहा बालके निरीक्षण गृहात दाखल



। नेरळ । प्रतिनिधी ।

बाल कल्याण समिती रायगड यांच्या आदेशाने जिल्हा परिवीक्षा संघटना संचालित सहा बालकांचे कर्जत येथील निरीक्षण गृहात काळजी व संरक्षणासाठी दाखल करण्यात आले आहे. संबंधीत मुलांची नावे सोनू मनोज कांबळे (१३), विजय रामु सिंग (०९), राज सुरेश वाघमारे (१२), सोनू विजय (१३), लक्ष्मण संतोष पवार (१५), महेश लक्ष्मण (१४) अशी असून तीस दिवसांच्या आत या ६ बालकांच्या पालक व नातेवाईकांनी कर्जत येथील जिल्हा परिवीक्षा संघटना संचालित मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह (९९७०१२२६२३) किंवा अलिबाग येथील जिल्हा महिला व बालविकास विभाग (७७७५०१८१९७) यांच्याशी संपर्क साधाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अन्यथा बालकांची जबाबदारी घेण्यास कोणीही नाही असे समजून बाल कल्याण समितीच्या मार्फत बालकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात येईल.

# मित्रांशीच राजकारण

नरेंद्र मोदी सरकारातील बहुतेक जुन्या मंत्र्यांची खाती तीच ठेवण्यात आली आहेत. तेलुगू देसमने पाठिंबा देण्याच्या बदल्यात अमित शाह यांना हटवण्याची अट घातल्याची चर्चा होती. पण त्या अफवाच ठरल्या. शाह यांच्या अखत्यारीतील इडी व सीबीआयने सर्वच पक्षांना इतके छळले आहे की या मागणीला त्यांचाही पाठिंबा मिळाला असता. पण मोदींनी अमित शाह यांनाच नव्हे तर निर्मला, जयशंकर, राजनाथ, गडकरी या सर्वांची खातीही पूर्वीसारखीच ठेवली आहेत. शिवराजसिंग चौहान हे खरे तर मोदींपेक्षाही वरिष्ठ असलेले नेते आहेत. त्यामुळे त्यांना कोणते खाते मिळते याचे कुतूहल होते. त्यांना शेतकी खाते दिले गेले आहे. सध्याच्या काळात हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. चौहान यांच्या काळातच मध्य प्रदेश हा देशातील उत्तर प्रदेशाखालोखालचा दुसऱ्या क्रमांकाचा गहू पिकवणारा प्रदेश झाला. सरकारी गहूखरेदीतही त्याचा क्रमांक दुसरा आहे. याखेरीज सोयाबीन, चणाडाळ, टोमॅटो, लसूण, धने, मेथी यांच्या उत्पादनात मध्य प्रदेश पहिल्या क्रमांकावर गेला आहे. चौहान यांचे व्यक्तिमत्व सौम्य आहे. ते मुळात अडवानी गटाचे मानले जातात. सुषमा स्वराज यांच्याप्रमाणेच त्यांचेही नाव एकेकाळी पंतप्रधानपदासाठी घेतले जात असे. पण गेल्या मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकांच्या वेळी भाजपचया प्रचारातून त्यांचे नाव गायब करण्यात आले. चौहान यांच्या जोडीने अनेक इतर नेत्यांच्या प्रचारयात्रा काढण्यात आल्या. मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची प्रसिध्दी करण्यात आली नाही. निवडणुकीनंतर त्यांना पध्दतशीरपणे डावलण्यात आले व मोहन यादव यांना ते पद दिले गेले. तरीही चौहान शांत राहिले. त्यांनी निषेधाचा एकही सूर काढला नाही. आता त्यांना भाजपचे अध्यक्षपद दिले जाईल अशी अटकळ होती. पण मोदी व शाह पक्षावरची आपली पकड सोडणे शक्य नव्हते. त्यामुळे चौहान यांना केंद्रात सामावून घेण्यात आले आहे.

### अडगळीतील नेत्यांची वासलात

चौहान यांनी या खात्यात कितीही कर्तबगारी दाखवली तरी कृषी हा मुळात राज्याचा विषय मानला जातो. शिवाय, शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी आणि शेतीतील इतर समस्या या किचकट आहेत. शेतकरी आंदोलनातून त्याचा प्रत्यय आला होता. शेतीच नव्हे तर कोणत्याही खात्याचे निर्णय मोदी आणि त्यांचे पंतप्रधान कार्यालयच घेत असते. मात्र या निर्णयांबाबत जनतेला सामोरे जाण्याची जबाबदारी आता चौहान यांच्यावर येऊन पडेल. अर्थात, यंदा भाजपला बहुमत न मिळाल्याने व जागा कमी झाल्यानेच चौहान यांना थोडेफार महत्व देणे मोदी यांना भाग पडले आहेत हे उघड आहे. तेलुगू देसमचे राममोहन नायडू यांना हवाई वाहतूक खाते देण्यात आले आहे. म्हटले तर हे खाते अजूनही महत्वाचे आहे. मात्र एअर इंडियाच्या विक्रीनंतर या खात्याच्या अखत्यारीतील सरकारी कंपन्या गेल्या आहेत. इतर मित्रांपैकी चिराग पासवान यांना अन्न प्रक्रिया उद्योग विभाग देण्यात आला आहे. पूर्वी तो अकाली दलाकडे होता. जड उद्योग किंवा सूक्ष्म व लघुउद्योग ही खातीदेखील अनुभवी नेत्यांना मान राखण्यापुरती द्यायची असतात ही काँग्रेसपासूनची परंपरा आहे. पूर्वी मनोहर जोशी, विलासराव देशमुख आणि नारायण राणे या माजी मुख्यमंत्र्यांनी ती सांभाळली. आतादेखील बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि ७९ वर्षांचे दलित नेते जीतनराम मांझी यांच्याकडे राणे यांचे सूक्ष्म उद्योग तर कुमारस्वामी या कर्नाटकाच्या माजी मुख्यमंत्र्यांकडे अवजड उद्योग देण्यात आले आहे. नीतीश यांच्या मंत्र्यांकडे मत्स्य व्यवसाय हा विभाग गेला आहे. पूर्वी तो गुजरातच्या मनसुख मांडविया यांच्याकडे होता. पण तेलुगू देसम किंवा नीतीश यांना पाठिंब्याच्या बदल्यात मोक्याची व महत्वाची खाती मिळतील ही अपेक्षा फोल ठरली आहे. मोदी यांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या आधारे दबाव निर्माण करून सहकारी नेत्यांना फार मागण्या करू दिलेल्या दिसत नाहीत. उलट त्यांना किरकोळ खाती देऊन त्यांची जागा दाखवून दिली आहे.

### शिंदे हेच खरे प्रतिस्पर्धी

मोदींच्या लेखी भाजपचे गेल्या वेळचे सरकारच पुढे चालू राहणार आहे. भाजपच्या गेल्या वेळपेक्षा साठ जागा कमी झाल्या आहेत. तरीही आपण हरलेलो नाही हे मोदींना दाखवून द्यायचे आहे. त्यामुळेच मंत्र्यांची खाती कायम ठेवण्याचा अट्टहास केला गेला आहे. दुसरीकडे आपल्याच सहकारी पक्षही आपल्याच जरबेत आहेत हे त्यांना पुन्हापुन्हा सिध्द करावे लागणार आहे. त्यामुळेच सर्वांची किरकोळ खात्यांवर बोळवण करण्यात आली आहे. शपथ घेतेवेळी मोदींनी एनडीएची बरीच भलामण केली होती. आता आपल्या सहकाऱ्यांना या रीतीने वागवल्यावर त्याची प्रतिक्रिया उमटणार आहे. कधी व कशी हे काही दिवसातच कळेल. महाराष्ट्रातील शिंदे गटाला कॅबिनेट मंत्रिपद न दिल्याबद्दल श्रीरंग बारणे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळी याचे परिणाम दिसतील. लोकसभेच्या जागावाटपात एकनाथ शिंदे यांनी भाजप नेत्यांच्या नाकात दम आणला होता. नंतरही भाजपपेक्षाही त्यांच्या यशाचे प्रमाण किंवा स्ट्राईक रेट अधिक राहिला. देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या नेत्यांना हा धोक्याचा इशारा वाटतो आहे. म्हणूनच त्यांनी राजीनामा देऊन भाजपला बळकट करण्याचा पवित्रा घेतला आहे. आपण याबाबतची रणनीती अमित शाह यांना सांगितली आहे असे ते म्हणाले होते. मोदींच्या खातेवाटपामुळे ही रणनीती उघड झाली आहे. भाजपचे नेते यापुढे शिंदे गटाची वाटचाल रोखण्याचा पुरेपूर प्रयत्न करतील. शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रिपद मिळू नये असेच त्यांचे डावपेच असतील. नजीकच्या काळात तरी त्यांचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी हा अजितदादा किंवा ठाकरे शिवसेना नसून शिंदे गट हाच आहे. त्यांच्यावर अंकुश ठेवायचा, पण त्यांना नाराजही होऊ द्यायचे नाही असे राजकारण भाजप यापुढे खेळेल. बिहार, आंध्र, कर्नाटकातही हेच घडेल. सध्या तरी मोदींची प्रतिमा इतकी मोठी आहे की, त्यांच्यापुढे मोठ्या मागण्या करणे या सहकारी पक्षांना कठीण होईल. पण सर्व दिवस सारखे नसतात हे निवडणुकीत दिसले आहेच. मोदी ते विसरले तर त्यांनाही फटके बसतीलच.

विचार

# बहुमत मिळवताना बेजार!

**_चुकीची घोषणा पुढची पाच वर्षं विरोधी बाकांवर बसवू शकते. घोषणा कितीही आकर्षक असली, तरी तिला तथ्याचा आधार लागतोच. अन्यथा, सत्तेची स्वप्ने पत्त्यांच्या बंगल्यांसारखी कोसळू शकतात. एखादी घोषणा यशस्वी होते, तेव्हा ती आपण सर्वप्रथम दिल्याचे दावे अनेकजण करतात; पण 'चारसो पार'च्या बाबतीत ही शक्यता मोदी यांनी मोडीत काढली होती. जनतेनेही ती मोडीत काढून तीनशेच्या आत आणून ठेवली._**



**भागा वरखडे**

संसदीय लोकशाही पद्धतीत सत्ताधारी पक्ष आणि तितकाच प्रबळ विरोधी पक्ष हवा असतो. तसे झाले नाही, तर सत्ताधारी पक्षाची एकाधिकारशाही सुरू होते आणि नंतर तो हुकूम शाहीकडे वाटचाल करू लागतो. भाजपने यापूर्वी 'काँग्रेसमुक्त भारत' आणि नंतर 'विरोधी पक्षमुक्त भारत' अशी घोषणा दिली होती. या घोषणा सत्ता मिळवण्यासाठी उपयुक्त असल्या, तरी प्रत्यक्षात आल्या, तर लोकशाही व्यवस्थेला मारक असतात. भारतातील निवडणुकांचा इतिहास अनेक घोषणांचा आहे 'जब तक सूरज चाँद रहेगा, इंदिरा तेरा नाम रहेगा', 'इंदिरा हटाओ, देश बचाओ', 'गरिबी हटाओ', 'गाय वासरू, नका विसरू', 'सब को देखा बारी बारी, अब की बार अटल बिहारी', 'मजबूत नेता निर्णायक सरकार', 'खेला होबे,' 'अब की बार मोदी सरकार चारसो पार' याबरोबरच 'कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा' अशा घोषणांनी निवडणुकांची मैदाने गाजली आहेत. गीतातून, काव्यातून, अलंकारातून अचूक आणि थेट संदेश देणारी, आक्रमक, आकर्षक घोषणा लोकांच्या मनात रुंजी घालत असते. एखाद्या विरोधकांच्या काय प्रतिक्रिया येतात, यालाही महत्त्व असते. काँग्रेसच्या जाहिरातींचा वीट या पक्षाला फटका बसला होता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातही 'इंडिया शायनिंग'वर लोकांची प्रचंड नाराजी दिसली होती. लोकांच्या करातून मिळालेला पैसा निवडणुकीच्या अगोदर सत्ताधारी पक्ष आपली प्रतिमा उजळण्यासाठी घालवत असेल तर त्याची प्रतिक्रिया उमटतेच. महाराष्ट्रात सरकारचे विकासाचे गोडवे गाणारे रथ गावोगावी याच कारणासाठी रोखले जात होते. काहींनी तर थेट विकासकामांबाबत माहिती देता, की भाजपचा प्रचार करता असा सवाल केला होता.

मोदी यांनी 'अबकी बार, चारसो पार'ची घोषणा केल्यानंतर त्याला पुढे यमक जोडून चारशे पार नव्हे, तडीपार अशी घोषणा काही नेत्यांनी केली होती. विरोधकांना एखाद्या घोषणेतील कच्चे दुवे दिसले, तर प्रचार मोहिमेसाठी ओतलेला सगळा पैसा पाण्यात जाण्याची भीती असते. चुकीची घोषणा पुढची पाच वर्षं विरोधी बाकांवर बसवू शकते. घोषणा कितीही आकर्षक असली, तरी तिला तथ्याचा आधार लागतोच. अन्यथा, प्रचार मोहीम आणि सत्तेची स्वप्ने पत्त्यांच्या बंगल्यांसारखी कोसळू शकतात. एखादी घोषणा यशस्वी होते, तेव्हा ती आपणच सर्वप्रथम दिल्याचे दावे अनेकजण करतात; पण 'चारसो पार'च्या बाबतीत ही शक्यता मोदी यांनी आधीच मोडीत काढली होती. आता जनतेने ती मोडीत काढून तीनशेच्या आत आणून ठेवली.

भाजपच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला चारसो पारपासून तीनशेच्या आत जागा मिळण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला, हे समजून घेतले पाहिजे. काँग्रेसला चाळीसही जागा मिळणार नाहीत, असे म्हणणाऱ्यांना मतदारांनीच चपराक दिली. 'इंडिया आघाडी'ने अपक्षेपेक्षा मोठी उसळी घेतल्याने भाजपला मोठा धक्का बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट ओसरल्याचे आणि मोदी हमींवरचा लोकांचा विश्वासही कमी झाल्याचे निष्कर्ष निवडणुकीच्या निकालातून दिसतात. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांना आता 'एनडीए'मध्ये जास्त महत्त्व येण्याची शक्यता आहे; परंतु त्यांनाही मनोमन 'इंडिया' आघाडीशी जुळवून घेतले असते, तर बरे झाले असते, असे आता वाटत असेल. 'इंडिया'आघाडी बांधण्यात सुरुवातीला पुढाकार घेणारे नितीशकुमार यांना आता आपला निर्णय चुकला, असे वाटत असेल. नितीशकुमार आणि चंद्राबाबू या दोघांशीही चांगले संबंध असल्याने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शरद पवार यांनी या दोघांशीही संपर्क साधून बरोबर येण्याचे साकडे घातले. महायुती आणि 'इंडिया' आघाडीतील अन्य कुणी कुठे जाणार नाहीत; परंतु या दोघांमुळे सत्तेचे पारडे बदलू शकते. पवार यांनी त्यांना विशेष राज्याच्या सवलतीसह अन्य मागण्या मान्य करण्याची ग्वाही दिल्याने आता या दोघांच्या भूमिकेवर सत्तेचा कौल कुणाकडे हे ठरू शकेल.

विशेष म्हणजे ज्या पाच राज्यांवर भाजपची मदार होती, त्याच बालेकिल्ल्यात भाजपला मोठा सुरुंग बसला. भाजपला उत्तर प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, आणि पश्चिम बंगालमध्ये मोठा फटका बसला. महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये फटका अपेक्षित होता; परंतु 'क्लीन स्वीप'ची स्वप्ने पाहणाऱ्या राजस्थान आणि उत्तर प्रदेशने कमाल केली. अखिलेश, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'चारसो पार'च्या घोषणेला सुरुंग लावला. उत्तर प्रदेशमध्ये भाजपला गेल्या वेळेपक्षा निम्म्याही जागा मिळाल्या नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये राम मंदिर उभारल्यानंतर मोदी सरकारला मोठा फायदा होईल असे चित्र होते; परंतु भाजपला राम काही पावला नाही. भाजपने राजस्थानमध्ये २०१९ मध्ये 'क्लीन स्वीप' केले होते. काँग्रेसला एखाद-दुसरी जागा मिळण्याचा अंदाज होता. तिथे काँग्रेस मोठी आघाडी घेत असल्याची चिन्हे होती. भाजपने सर्वाधिक लक्ष पश्चिम बंगालवर केंद्रीत केले होते. तिथे भाजप किमान २५-३० जागा जिंकेल, असे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात ममतादीदी भाजपला पुरून उरल्या. संदेशखाली, इतर मागासांची प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय, शिक्षक भरती घोटाळा असे कुठलेही मुद्दे तिथे भाजपच्या मदतीला आले नाहीत. 'चारसो पार'च्या या घोषणेने भाजपचा फायदा होण्यापेक्षा जास्त नुकसान केले. या घोषणेमुळे भाजप कार्यकर्त्यांचा अतिआत्मविश्वास वाढला आणि त्यांनी मतदारांना वळवण्यासाठी फारसे प्रयत्न केले गेले नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये तर भाजपने भाकरी फिरवलीच नाही. ज्यांच्यावर आरोप होते, ज्यांच्याविषयी नाराजी होती, त्यांनाच पुन्हा उमेदवारी दिली गेली. इतरांवर घराणेशाहीचे आरोप करत असताना मोदी आणि भाजपच्या नेत्यांनीच घराणेशाही जोपासली. अशा अनेकांना उमेदवारी दिली. भाजपने राज्यातील बहुतांश जागांवर उमेदवारांची पुनरावृत्ती केली होती. यामुळे जनतेने नाराजी मतपेटीतून दाखवली. ईशान्य क्षेत्र वगळता दिल्लीतील सर्व जागांवर भाजपने उमेदवार बदलले. तिथे त्याचा थेट फायदाही झालेला दिसतो. महाराष्ट्र, राजस्थान आणि उत्तर प्रदेशमध्ये उमेदवार बदलण्याचे प्रमाण कमी होते. बहुजन समाज पक्षाला गेल्या वेळी दहा जागा मिळाल्या होत्या. या वेळी त्यांची स्वबळाची चाल पक्ष संपवण्याच्या दिशेने घेऊन गेली. भाजपला त्याचा फायदा झाला नाही. मायावती यांचा हेतू लक्षात आल्याने लोकांनी ती मते 'इंडिया' आघाडीला देणे पसंत केले. न्यायालयाचा आदेश डावलून आरोप असलेल्यांची बांधकामे उद्ध्वस्त करण्याचा योगी सरकारचा निर्णय सामान्यांना अजिबात पसंत नव्हता. २०१९ च्या निवडणुकीत मायावती यांच्या पक्षाने १९ टक्क्यांहून अधिक मते मिळवली होती आणि १० जागा जिंकल्या होत्या. या वेळी मायावती यांच्या पक्षाची मतांची टक्केवारी दहाच्या आत आली. गेल्या निवडणुकीत समाजवादी पक्षाला केवळ १८ टक्के मते मिळाली होती, ती यावेळी ३१ टक्के झाली. म्हणजेच या वेळी बसपची मते सपच्या खात्यात गेल्याचे स्पष्ट दिसले. हरियाणामध्ये भाजपच्या जागा कमी झाल्या. काँग्रेसला तिथे चांगल्या जागा मिळाल्या. हरियाणा हा भाजपचा बालेकिल्ला आहे; मात्र पंजाब आणि हरियाणाच्या शेतकऱ्यांचे आंदोलन आणि सोयबीनच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे भाजपला भोवले. भाजपच्या निगरगट्ट भूमिकेमुळेच पारंपारिक मतदार काँग्रेसकडे वळला, असे म्हणायला जागा आहे. पंजाबमध्ये भाजपचे मोठे नुकसान झाले. कर्नाटकमध्ये धर्मनिरपेक्ष जनता दलाबरोबरची युती फायद्यात ठरण्याऐवजी भाजपचे मोठे नुकसान करून गेली. भाजपने गेल्या निवडणुकीमध्ये कर्नाटकमधील २८ पैकी २६ जागा जिंकल्या होत्या. मात्र माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे चिरंजीव आणि नातवाने सुमारे तीन हजार महिलांचे लैंगिक शोषण केले. खासदार प्रज्वल रेवण्णा पराभूत झाला; परंतु त्याचबरोबर त्याच्यासाठी प्रचार करणाऱ्या मोदी यांनाही कर्नाटकच्या जनतेने झटका दिला. ऐन निवडणुकीत हे प्रकरण बाहेर येऊनही रेवण्णा प्रकरणावर भाजपने पाहिजे तशी कारवाई केली नाही. उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक जागा आहेत. इथे भाजप आणि त्याच्या मित्रपक्षांनाही मोठा फटका बसला. शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचा फायदा भाजपला झाला नाही. उलट, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना सहानुभूती मिळाली, हे ताज्या निकालांमधून स्पष्ट झाले.

आजकाल

# गोदी मिडियाचा मोदी -गौरव पुन्हा सुरू

**तुषार गायकवाड**

केंद्रातील एनडीए सरकारचा शपथविधी पार पडला असून कार्यभार स्वीकारल्यानंतर एनडीए सरकारचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकरी सन्मान निधीचा १७ वा हप्ता अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यासाठी स्वाक्षरी केली. त्यामुळे गोदी मेडीया मोदींचा पहिला दिवस शेतकऱ्यांना समर्पित अशा प्रकारच्या नेहमीप्रमाणे गोदी बातम्या दाखवायला लागला आहे.

प्रत्यक्षात शंभू बॉर्डरवर जानेवारी २०२४ मध्ये सुरु झालेल्या शेतकरी आंदोलनास २९ मे २०२४ रोजी १०० दिवस पूर्ण झाले असून आजही शंभू बॉर्डर प्रशासनाने सील केलेली आहे. शेतकऱ्यांचा पुळका दाखवणारे मोदी आणि त्यांचे एनडीए मधील घटकपक्ष सहकारी या आंदोलनापासून अनभिज्ञ असतील का?

गेल्या १०० दिवसात या शेतकऱ्यांच्या आंदोलनाची एक तरी बातमी आपण मेनस्ट्रीम मेडीयाचे न्यूज चॅनेलवर पाहीली किंवा वृत्तपत्रात वाचली का? महाराष्ट्रातील एखाद्या मराठी वृत्तपत्राने यासंदर्भात बातमी दिली का? तर याचे उत्तर नाही! असेच आहे. कारण या सर्वांनी शेतकरी आंदोलनाचे वार्तांकन करु नये असे अलिखित आदेशच जानेवारी मध्ये त्यांना दिले होते.

आज रोजी शंभू बॉर्डर वरुन पुढे सरकू दिले जात नाही. म्हणून पंजाबचे शेतकऱ्यांनी बॉर्डर वरच अस्थायी स्वरुपाचे मंडप उभारुन आंदोलन सुरु ठेवले आहे. एनडीए सरकारच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आम्हाला १० वर्षे इथे बसवले तरी आम्ही बसणार परंतू हमीभावाचा कायदा घेतल्याशिवाय आंदोलन स्थगित करणार नाही. अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

मे महिन्यात शंभू बॉर्डर येथे तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत गेले. आंदोलक शेतकऱ्यांना सरकारने पिण्याचे पाणी मिळू नये अशी तजवीज केल्याने आंदोलक शेतकऱ्यांनी स्वतःची बोअरवेल खोदून पाण्याची सोय केली. आंदोलकांच्या सोईसाठी शौचालये उभारली. मतदानाचा हक्क देखील बजावला.

तर दुसरीकडे शेतकऱ्यांनी शंभू बॉर्डर पार करुन दिल्लीत येऊ नये म्हणून आधी मोदी सरकारने आणि आता एनडीए सरकारने पोलीसांना तंबू उभारुन पहाऱ्यावर उभा केले आहे. हे वास्तव गोदी मेडीया, मराठी वृत्तपत्रे जनतेसमोर आता तरी मांडतील का?

भाजपा स्पष्ट बहुमतापासून दूर राहिले म्हणजे संविधान व लोकशाही वाचवण्याचा लढा संपलेला नाही. एनडीए सरकारचा गोदी मेडीयाच्या माध्यमातून सुरु झालेला लबाडीचा धंदा नेस्तनाबूत केल्याशिवाय जनतेत जागृती होणार नाही. गोदी मेडीया असत्य सांगेल आपण सत्य सांगत राहू!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी एनडीए सरकारचे, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कान टोचले, मणिपूर वरुन घरचा आहेर दिला. वगैरे हेडलाईन देणे उच्च प्रतिची फसवणूक आहे. मणिपूर जळत असताना नवीन संसदेचे उद्घाटन सुरु होते.

मणिपूर मध्ये स्त्रीयांची विटंबना होत असताना राम मंदिराचे उद्घाटन सुरु होते. तेव्हा मोहन भागवत मोदींसोबत मंदिरात पूजेले बसले होते. तेव्हा मोदींनी मणिपूरला जावे असे भागवतांना का वाटले नसेल? मणिपूर जळतंय त्याला सर्वस्वी जबाबदार केंद्र सरकार आहे. तब्बल ११ महिने झाले तरी हिंसाचार थांबलेला नाही.

मग भागवत काकांना अचानक मणिपूरच्या घटनांनी पान्हा का फुटला? कारण पुढील वर्षी संघाची शंभरी भरतीये. त्या अगोदर लंगडे एनडीए सरकार ढासळले तर संघाची पंचाईत होवू नये म्हणून संघ कसा तटस्थ आहे हे दाखवण्याचा प्रयत्न भागवतांनी केला आहे.

ऐन लोकसभा निवडणूकीच्या प्रचारात हुकुमशाही पध्दतीने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष केलेले लोकप्रिय लोकनेते जे. पी. नड्डा यांनी 'भाजपाला आता संघाची आवश्यकता नाही, आम्ही सक्षम' असे म्हणण्यामागेही हेच कारण होते.

संघ आणि भाजपा यात अजिबात दरी नाही. अगदी दो जिस्म एक जान आहेत. फक्त जनतेला मूर्ख बनविण्याचे धंदे सुरु असतात. आणि गोदी मेडीया सोईस्कर हेडलाईन देत असतो.

लोकसंसद

## 'किमान सरकार कमाल प्रशासन' तत्वाला मुरड

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळातील रालोआ सरकारच्या मंत्रिमंडळात ७१ केंद्रीय-राज्यमंत्र्यांचा भरणा असल्यामुळे जंबो मंत्रीमंडळ झाले आहे. साहजिकच त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या कार्यकाळातील मंत्रिमंडळाच्या छोट्या आकाराची आठवण आली. किमान सरकार कमाल प्रशासन हे सूत्र केंद्रस्थानी असलेल्या २०१४ च्या मंत्रिमंडळात ४६ सदस्य होते. तर २०१९च्या मंत्रिमंडळात ५८ सदस्य होते. पंतप्रधान मोदी यांनी 'किमान सरकार कमाल प्रशासन' हा माझ्या कारभाराचा मंत्र असल्याचे वेळोवेळी म्हटले आहे. यंदाच्या फेब्रुवारीत दुबई येथील जागतिक सरकारच्या शिखर परिषदेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी याच मंत्राचा पुनरुच्चार केला. त्यावेळी ते म्हणाले होते, 'किमान सरकार, कमाल प्रशासन' हे माझे सर्वात मोठे तत्त्व आहे. असे असताना यंदा मात्र पंतप्रधान मोदींना आघाडी सरकारमुळे या तत्वाला मुरड घालावी लागली आहे असे दिसते. मंत्रीमंडळ मोठे असले तरी प्रशासन कमालच असेल याकडे मात्र पंतप्रधानांनी कटाक्षाने लक्ष द्यावे.

- **दीपक काशिराम गुंडये,** वरळी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१२ जून**

**१८६१:-** आगरकरांच्या 'सुधारक'मधील एक संपादक सीताराम गणेश देवधर यांचे निधन. 'माझा जीवन वृत्तांत' या त्यांच्या आत्मकथनातून महाराष्ट्रातील सुधारणांच्या लढ्यांचे तपशीलवार चित्रण झाले आहे. **१८९१:-** कवी आणि लोकमान्यांच्या गीतारहस्याचे इंग्रजी भाषांतरकार भालचंद्र सुकथनकर यांचे निधन. व्यवसायाने सॉलिसिटर असणाऱ्या सुकथनकरांनी आपल्या कविता 'इंदुविलास' या नावाने प्रसिद्ध केल्या. तसेच अनेक कवितांची इंग्रजी भाषांतरे केली. **१८९४:-** बौद्ध धर्मग्रंथांचे भाषांतरकार, पाली भाषाकोविद संपादक डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ बापट यांचा जन्म. १४० हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध. '२५०० इयर्स ऑफ बुध्दिझम' हा त्यांचा विशेष संपादकीय ग्रंथ. **१९०२:-** लेखक, कवी बळवंत हणमंत पळशीकर यांचा जन्म. विविध नियत कालिकांतून त्यांच्या कविता प्रसिध्द. 'वृंदावन' ह्या खंडकाव्यासह काही लेख व कविता प्रसिध्द त्यांच्या नावावर आहेत. 'बळवंत' या टोपणनावाने काव्यलेखन केले आहे. **१९१७:-** लेखक आणि अनुवादकार भालचंद्र दत्तात्रेय खेर यांचा जन्म. केसरी पत्रात त्यांनी काम केले व 'सह्याद्री'चे संपादकपद भुषविले. स्वा. सावरकरांवर 'यज्ञ' तर लालबहादुर शास्त्रींच्या जीवनावर 'अमृतपुत्र', 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर 'प्रबुध्द' ह्या कादंबऱ्या, चार्ली चॅप्लिनचे 'हसरे दु:ख' हे चरित्र, मनोहर माळगावकरांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद असे विपुल लेखन केले. २१ जून २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. **१९३१:-** मराठीतील सर्व नियतकालिकांतून कथा, काव्य, समीक्षात्मक लेखन करणारे प्रा. जगन्नाथ विठ्ठल महाजन यांचा जन्म. 'शब्दकार' या अनियतकालिकाच्या संपादनासह त्यांनी आघाडीवरील वीरकथा आणि समरगीते, 'गब्बुराव झब्बूराव' हे लोकनाट्य. 'गाफील' ही मराठी गझल, 'नजराणा' हा रुबाया संग्रह, 'गौरव गीतमाला', 'दर्शन', 'डहाळी' हे काव्यसंग्रह तसेच काही दीर्घकथा अशी साहित्य संपदा आहे. **१९३६:-** लेखक बाळकृष्ण रामचंद्र सातव यांचा जन्म. ह्यांचा 'कल्पनातरंग' हा कथासंग्रह तर 'निष्काम कर्मयोग' हा अध्यात्मिक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९३८:-** कवी उामराव भिकाजी इंगोते यांचा जन्म. 'क्रांती', 'फळसफुले' हे काव्यसंग्रह प्रकाशित. **१९३९:-** लेखक पांडुरंग दत्तात्रेय देशपांडे यांचा जन्म. वेद, उपनिषदे, संतसाहित्य हे अभ्यासाचे विषय असणाऱ्या देशपाड्यांची 'ज्ञानेश्वरी (सांकेतिक शब्ददर्शन) या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार. 'अनुभवामृत प्रश्नोपनिषद' हे पुस्तक आणि 'दवबिंदू' हे आत्मचरित्र प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९४०:-** 'लष्कर' या विषयावर लेखन करणारे कर्नल विनायक नारायण नांबेकर यांचा जन्म. 'आर्मी', 'नेव्ही', 'एअरफोर्स यांसह इतर विषयांवर विविध वृत्तपत्रातून, मासिकातून ३०० हून अधिक लेख प्रसिध्द. त्यातील काही लेख पुस्तकरुपात प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे. **१९४२:-** कवी, ललितगद्य लेखक गुरुनाथ नारायण धुरी यांचा जन्म. 'ग्लोरिया', 'समुद्र कविता', 'लालकोवळा काळोख' हे त्यांचे कवितासंग्रह, तर 'आदिकाळोख' हा ललितगद्य लेखांच्या संग्रह ही त्यांची ग्रंथसंपदा. त्यांची कविता गूढ, चिंतनात्मक व जीवनाच्या सखोल जाणिवेची असल्याचा समीक्षकांचा अभिप्राय आहे. **१९४९:-** इतिहाससंशोधक चरित्रकार बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी यांचे निधन. 'बाजीप्रभू देशपांडे', 'मुरारबाजी देशपांडे' इत्यादी चरित्रे त्यांनी लिहिली. **१९५०:-** श्री समर्थ रामदास स्वामी आणि त्यांच्या रामदासी संप्रदायाच्या साहित्याचे अभ्यासक गणेश शंकर देव यांचे निधन. **१९५९:-** आपल्या कादंबऱ्यांतून स्त्रियांच्या प्रश्नांचा पुरस्कार करणाऱ्या लेखिका इंदिरा गंगाधर सहस्त्रबुध्दे यांचे निधन. पूर्वाश्रमीच्या मराठे. आंबेडकरांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात यांचा सहभाग. यांनी मधुमिनाक्षी या तामिळ कादंबरीचा 'गोदावरी' असा अनुवाद केला. **१९६०:-** विविध नियतकालिकांतून २५० हून अधिक लेख आणि ५५ शोधनिबंध प्रसिध्द झालेले लेखक, प्राणीशास्त्रज्ञ वन्यजीवरक्षक डॉ. सुधाकर मुरलीधर कुऱ्हाडे यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित साहित्यात 'सिनॉप्सिस व यात्रा' हा काव्यसंग्रह, 'निसर्गगान' हा निसर्गविषयक, 'आपली सृष्टी' हा पक्षी आणि 'मैत्री कीटकांशी' हे लेखसंग्रह प्रसिध्द. **१९६४:-** मराठी भाषाशास्त्रज्ञ, ग्रंथकार कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचे निधन. 'भाषाशास्त्र व मराठी भाषा, शब्द, उद्गम आणि विकास', 'मराठी व्याकरणांचे व्याकरण' आदी पुस्तके त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९६४:-** साहित्यिक वासुदेव दामोदर गोखले यांचे निधन. त्यांनी 'हिंदच्या स्वातंत्र्याचे जनक' या चरित्रमालेतून अनेक थोर पुरुषांची चरित्रे लिहिली. तसेच मराठी भाषेचा लघुकोश तयार केला. **१९६६:-** इतिहास संशोधक रामचंद्र गोविंद काठे यांचे निधन. इतिहास संशोधनातील त्यांची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे कवी भूषणाचे व्रज भाषेतील शिवरायवर्णनपर रचलेल्या काव्याचे परिश्रमपूर्वक संशोधन करुन त्यांनी त्याचा मराठी गद्य अनुवाद करुन 'संपूर्ण भूषण' हा सापेक्षी ग्रंथ तयार केला. याखेरीज शिवकालीन राजव्यवहार कोशाच्या तिसऱ्या आवृत्तीचे त्यांनी संपादन केले. **१९८१:-** कवी, काव्यसमीक्षक रामचंद्र अनंत काळेते यांचे निधन. 'नवे अलंकार', 'नवकवितेचे एक तप' हे त्यांचे काव्य समीक्षक ग्रंथ तसेच 'तांबे : एक अध्ययन' हा समीक्षात्मक प्रबंध अशी साहित्य संपदा आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ जून

१) श्री. वामन धर्मा गायकवाड
श्रीबाग-२, अलिबाग, १२-६-१९५२
२) श्री.चंद्रकांत रामदास पाटील
नागडोंगरी अलिबाग, १२-६-१९५२
३) श्री.चंद्रकांत नाथालाल मेहता,
मिरली-गल्ली, १२-६-१९५८
४)श्रीम प्रणिता सतिश वर्तक
चेंढरे, अलिबाग, १२-६-१९६२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुणालयात दाखल असलेल्या रुणांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**


**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मुख्य वाहिनीवर वीज पडून सहा इन्सुलेटर्स जमीनदोस्त

## मुरूड तालुका रात्रभर अंधारात; १२ तास वीज पुरवठा खंडित \ विजेच्या गडगडाटासह पावसाचे तांडव

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

**सोमवारी रात्री ८.३० च्या सुमारास मुरुड शहरासह तालुक्यात विजेच्या गडगडाटासह जोरदार पाऊस पडला. नांदला गावाजवळ पाब्रा-मुरुड या मुख्य वीज वाहिनीवर वीज पडल्याने मुरुडचा वीजपुरवठा खंडित झाला होता. मंगळवारी सकाळी १० वाजता तो पूर्ववत सुरू करण्यात वीज मंडळाला यश आले.**



याबाबत बोलताना मुरूड वीज वितरणचे उपकार्यकरी अधिकारी कृष्णांत सूर्यवंशी यांनी सांगितले की, सोमवारी रात्री ८.३० ते ९ च्या सुमारास विजेच्या गडगडाटासह जोरदार पाऊस पडला. या दरम्यान मुरूड तालुक्यातील नांदला गावाजवळील एका कोलंबी पालन प्रकल्पाजवळील २२ केवी वीज वाहीनीवर वीज पडून सहा पिन इन्शुलेटर्स पूर्णपणे निकामी झाल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, रात्री आणि पहाटे आम्ही व टीमने तातडीने पाब्रा( ता. म्हसळा) पर्यंत दोनदा पेट्रोलिंग केले. दुसऱ्या पेट्रोलींगच्या वेळी पहाटे नांदले गावाजवलील कोलंबी फिश पालन केंद्राचे व्यवस्थापन पाहणारे रामास्वामी यांनी रात्री वीज वाहिनीवर मोठा लोळ पडल्याचे सांगितले. त्यामुळे दोष शोधून काढणे अधिक सुलभ झाले. या घटनेत सहा पिन इन्शुलेटर्स जळल्याचे दिसून आले. त्यामुळे मुरूड आणि जंजिरा असे दोन वीज फिडर नादुरुस्त झाले. उपकार्यकरी अभियंता कृष्णांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली दुरुस्तीचे काम त्वरित हाती घेऊन प्रथम मुरूड आणि काही तासाच्या अंतराने जंजिरा फिडर सुरू करण्यात आले. मात्र, या नैसर्गिक

> पाऊस आणि विजेचा गडगडाट सुरू असताना नागरिकांनी शक्यतो टीव्ही, फ्रीज, वातानुकूलित यंत्रणा किंवा वीज उपकरणे बंद ठेवावीत, असे आवाहन मुरूड वीज वितरण विभागाचे उप कार्यकारी अभियंता कृष्णांत सूर्यवंशी यांनी केले आहे.

आपत्तीमुळे मुरुड तालुक्यातील नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागली. तब्बल १२ तास वीजपुरवठा खंडित होता. मंगळवारी दुपारपर्यंत सर्व तुटलेले इन्शुलेटर्स आणि वीज वाहिनीवरील दोष काढून तालुक्यातील वीज पुरवठा सुरू करण्यात आला. तर राजपुरी-खोकरी घुमट येथील जंजिरा फिडरवरील दुरुस्तीचे काम दुपारी पूर्ण झाले. तीन तासांत १५४ मिमी पावसाची नोंद झाल्याची माहिती तहसीलदार कार्यालयातील सूत्रांनी दिली. पावसाने सर्वत्रच पाणीच पाणी झाले होते.

> नांदला गावाजवळ मुख्य वीज वाहिनीवर आकाशातून विजेच्या लोळ पडताना पाहणारे प्रत्यक्षदर्शी कोलंबी पालन केंद्राचे व्यवस्थापक रामास्वामी म्हणाले की, पाऊस सुरू होता. आम्ही कोलंबी केंद्रा जवळ उभे असताना गडगडाट सुरू होता. अचानक विजेचा लोळ विद्युत पोलवरील इन्सुलेटर्स कंडक्टरवर पडताना आम्ही प्रत्यक्ष पाहिल्यानंतर आमची बोबडीच वळली. आम्ही खूपच धास्तावलो होतो. आम्ही झटकन आमच्या खोलीत पळाल्याने बचावलो, असे रामास्वामी यांनी सांगितले.

# चिल्लार नदीवरील पुल झाला, रस्ते कधी होणार?

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील अंत्राट खुर्द आणि अंत्राट वरेडी हि दोन्ही गावे जोडण्यासाठी चिल्हार नदीवर पूल बांधण्यात आला आहे. सरकारने त्या पुलासाठी ६० लाख रुपये खर्च केला आहे. मात्र, त्या पुलाला जोडणारे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केले नाहीत. दरम्यान, पुलाची निर्मिती होऊन चार वर्षाचा कालावधी लोटला तरी दोन्ही गावे जोडणारे रस्ते बनविले गेले नाहीत.



सार्वजनिक बांधकाम विभागाने कर्जत तालुक्यातील दोन्ही अंत्राट गावे जोडणारा पूल चिल्हार नदीवर बांधला आहे. या पुलाच्या निर्मितीसाठी बांधकाम विभागाने ६० लाख रुपये खर्च केले असून त्या पुलाची निर्मिती करण्याचा उद्देश हा प्रमुख दोन्ही अंत्राट गावे जोडून पावसाळ्यात आणि उन्हाळयात या गावांचा संपर्क तात्काळ होण्यासाठी हा पूल महत्वाचा होता. त्यामुळे अंत्राट वरेडी भागातील शेतकऱ्यांनी पुलाच्या बांधकामासाठी जागा दिली आणि रस्ता देखील बनविण्यास जागा दिली. नेरळ पिंपळोली गुडवण या रस्त्यावरून चिल्हार नदीवरील नवीन पुलापर्यंत ४०० मीटरचे अंतर असून त्या रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी जागा सोडून दिली असल्याने त्या मातीच्या रस्त्याने वाहनांची ये-जा उन्हळ्यात सुरु असते. मात्र, पलीकडे जाधवांच्या अंत्राट गावातील शेतकऱ्यांनी अद्याप पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून बांधलेला पूल हा सध्यातरी निरुपयोगी ठरत आहे.

या पुलाच्या निर्मितीचा निर्णय हा शासनाने दोन्ही बाजूची गावे जोडली जावी यासाठी घेतला होता. पुलावरून वाहनांची ये जा करण्यासाठी रस्ता असायला हवा. मात्र दोन्ही बाजूला रस्ते बनविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण केले नाही. त्याचा परिणाम चिल्हार नदीवरील तो पूल केवळ शोभेचे बाहुले बनून आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन रस्त्यासाठी कमीतकमी जागा मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी पुढे येत आहे. सरकारने रस्ता मंजूर केल्यास ग्रामस्थांच्या सोयीचे होणार आहे.

# पावसाळा सुरू होताच तळा तालुक्यातील बत्ती गुल

**। तळा । वार्ताहर ।**

पावसाला सुरुवात होताच तळा तालुक्यातील बत्ती गुल होण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. दरवर्षी पावसाच्या आगमनापासूनच तळा तालुक्यात विजेचा लपंडाव सुरू होतो. एकदा गेलेली वीज जवळजवळ ४ ते ५ तास येत नसल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय होत आहे.

पावसाळा सुरू व्हायच्या आधी महावितरण विभागाने झाडे तोडणे, बॉक्स मेंटेनन्स, ब्रेकर मेंटेनन्स, जिओडी मेंटेनन्स, जीर्ण खांब बदलणे यासारखी पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे वेळीच पूर्ण करणे गरजेचे असते. मात्र, पावसाळा तोंडावर आला असताना देखील महावितरण विभागाची ही कामे पूर्ण झाली नव्हती. परिणामी जराजरी ढगांचा गडगडाट अथवा रिमझिम पावसाला सुरुवात होताच महावितरण विभागाकडून तळा तालुक्याची बत्ती गुल करण्यात येते. त्यामुळे पावसाळ्यात जरी नागरिकांना थंडावा जाणवत असला तरी वीज गायब असल्याने लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांना रात्रभर मच्छरांचा सामना करावा लागत आहे. काहीवेळा मुसळधार पावसामुळे दिवसभर तालुक्याचा वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसतो. त्यामुळे नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत असून वीज बिल वसुलीसाठी महावितरण जेवढ्या तत्परतेने मेहनत घेते ती मेहनत पावसाळी वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी का घेत नाही, असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

## शेतीच्या कामाला वेग

**पनवेल :** जून महिन्यात वरुण राजाने बरसण्यास सुरुवात केल्यावर शेतकरी राजा शेतीच्या कामात जुंपला आहे. पनवेल तालुक्यात शेतीच्या कामाला सुरुवात झाली आहे. आधुनिक पध्दतीने येथे शेती केली जात आहे. त्याकाळी नांगरणी करता पूर्वी बैल होते. मात्र, सध्या बैल दिसेनासे झाले असून त्याची जागा ट्रक्टरने घेतली आहे. नांगरणी झाल्यावर शेतात असलेले गवत काढून टाकण्यात आले. त्यानंतर भाताच्या बियांची पेरणीला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड आनंदाचे वातावरण आहे.

## नागोठण्यात भीषण आग

**नागोठणे :** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एस.टी. स्थानकासमोरील म्हात्रे बिल्डिंगमधील दुकानांना ११ जून रोजी मध्यरात्री दीड वाजण्याच्या दरम्यान भीषण आग लागली. या आगीत हॉटेल कल्पनासह तीन दुकाने जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीमुळे सुमारे सात दुकानांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अग्निशामक दलाला पाच ते सहा तासांच्या अथक प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सदरची आग शॉर्ट सर्किटमुळ लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आगीत दुकानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

# पहिल्याच पावसाने केली पोलखोल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

शहराला लागून असलेल्या आराठी ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छतेचे तीन तेरा झालेले पाहायला मिळत आहे. मंगळवारी पहाटे श्रीवर्धन तालुक्यामध्ये मुसळधार पाऊस पडत होता. पाऊस जोरदार पडल्यामुळे गटारातील पाणी वाहू लागले व गटारामध्ये असलेला प्लास्टिकचा कचरा मेटकर्णी परिसरातील रस्त्यावरती सर्वत्र पसरलेला पाहायला मिळत होता. डम्पिंग ग्राउंड अद्यापपर्यंत अस्तित्वात नाही. पण लोकसंख्या जास्त असल्यामुळे कचरा खूप मोठ्या प्रमाणात या ठिकाणी जमा होतो.



परिसरातील नागरिक श्रीवर्धन-दिघी रोडवरती गोखले कॉलेजच्या समोर कचरा टाकताना पाहायला मिळतात. त्या ठिकाणी मोठमोठे कचऱ्याचे व प्लॅस्टिकचे ढीग जमलेले नजरेस पडतात. वास्तविक पावसाळा सुरू होण्याअगोदर मेटकर्णी परिसरातील गटारांमध्ये असलेला कचरा ग्रामपंचायतीने काढून गटारे स्वच्छ करणे गरजेचे होते. परंतु अशा प्रकारे कोणतीही कामे झाले नसल्याचे दिसून येत आहे. अनेक वेळा प्लास्टिकच्या पिशव्या गटारामध्ये अडकल्यानंतर त्या ठिकाणी पाणी तुंबण्याचे प्रकार घडतात. परंतु श्रीवर्धन तालुक्यात प्लास्टिक बंदी कोणत्याही ठिकाणी राबवलेल्याचे दिसून येते नाही. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत सुद्धा सर्व दुकानदार सर्रासपणे ग्राहकांना प्लास्टिकची पिशवी देत असतात.

तरी श्रीवर्धनचे तहसीलदार, गटविकास अधिकारी व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी प्लास्टिक बंदी अतिशय काटेकोरपणे राबवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# आंबेवाडी नाक्यावर सर्व्हिस रोड बनवा

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील आंबेवाडी नाका येथे निकृष्ठ दर्जाच्या रस्त्यामुळे प्रवास करणे मुश्कील झाले आहे. येथे तातडीने सर्व्हिस रोड बनवा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी विविध क्षेत्रातील नागरिकांनी एकत्र येऊन रास्ता रोको केला. रस्त्याचे काम लवकर व्हावे यासाठी नागरिक आक्रमक झाले होते. त्यामुळे येथे काही प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

आंबेवाडी बाजारपेठेतील रस्त्याची दयनीय अवस्था पाहता या ठिकाणी दररोज अपघात होताना दिसत असुन आंबेवाडी ग्रामपंचायतीची ग्रामसभा सुरु असताना याविषयी संबंधित ठेकेदार याला फोन केला करण्यात आला. त्याने फोन उचलला नाही. याआगोदर संबंधित ठेकेदार याला लेखी अर्ज दिला होता. परंतु ठेकेदाराने कोणतेही काम केले नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य तसेच व्यापारी, रिक्षा संघटना आक्रमक होऊन आंबेवाडी नाका येथे एकत्र येत रस्ता रोको आंदोलन केले.

चौपदरी करण्याचे काम गेली १२ वर्षांपासून सुरु आहे. येथून मार्ग काढताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत असुन या ठिकाणी दररोज अपघात होत आहेत. एखाद्याचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण?

यावेळी माजी सरपंच सुरेश महाबळे, माजी उपसरपंच कुमार लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत लोखंडे, गणेश शिंदे, संजय कुर्ले, राकेश लोखंडे, महेंद्र वाचकवडे, विजय बोरकर, अविनाश पलंगे, दादा धुमाळ, मंगेश घायले, व्यापारी वर्ग, रिक्षा संघटनेचे पदाधिकारी व सदस्य तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहोपाड्यात प्रदर्शन, विक्री मेळावा

**। रसायनी । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्यावतीने स्थानिक महिला बचतगट आणि महिला गृह उद्योग यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी ८ आणि ९ जून रोजी मोहपाड्यातील जनता विद्यालय येथे दोन दिवसांसाठी प्रदर्शन आणि विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या दोनीही दिवशी प्रदर्शनाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिला गृहउद्योगाला प्रोत्साहन आणि व्यवसाय देण्यासाठी रसायनिकरांनी मेळाव्याला भेट दिली आणि त्यांची उत्पादने खरेदी करून पाठिंबा दिला. या मेळाव्याला वासंबेचे सरपंच उमा मुंढे, निलम पाटील व इतर सदस्यांनी स्टॉलला भेट देऊन त्यांना प्रोत्साहन दिले. तसेच, मेळाव्याच्या दुसऱ्या दिवशी पनवेल पालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, सद्गुणा पाटील व इतर सहकाऱ्यांनी मेळाव्याला भेट दिली. त्यांनी उद्योजकांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

रोटरी क्लबचे सदस्य सुनील कुरूप, बाळकृष्ण होणावले, अनुराधा होणावले, गणेश म्हात्रे, वर्षा पाटील, राजू गायकवाड, रेवती गायकवाड, डॉ. शीतल भगत, डॉ. मिलिंद भगत, अमित शाह, जयश्री पाटील, विजय पाटील, शारदा काळे, देवेंद्र महिंद्रकर, शशिकांत शानभाग, अमित शानभाग, राम गाताडे, रश्मी गाताडे, सुशांत उचिल, डॉ. लेखा उचिल, सुनील भोसले, सदगुणा पाटील, आशु गर्ग, रश्मी गर्ग, संचिता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## शाम म्हात्रे यांची पुण्यतिथी

**। उरण । प्रतिनिधी ।**

दिवंगत ज्येष्ठ नेते शाम पदाजी म्हात्रे यांचे सहावे पुण्यस्मरण ९ जून रोजी खांदा कॉलनी येथील त्यांच्या निवासस्थानी करण्यात आले. याप्रसंगी शाम म्हात्रे यांच्या कन्या श्रुती म्हात्रे यांनी अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. शाम म्हात्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी आगरी शिक्षण संस्था शाळेत अभिवादन करण्यात आले. श्रुती शाम म्हात्रे यांच्या हस्ते शाम म्हात्रे यांच्या प्रतिमेला पुष्हार अर्पण करण्यात आला. आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक पंकज भगत, शिक्षक, कामगार आणि नागरिक उपस्थित होते.

# औषधोपचाराकरीता आर्थिक सहाय्य



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या उतेखोल येथील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या पतसंस्थेतर्फे संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून आजारी सभासदाला औषोधोपचाराकरीता आर्थिक सहाय्य देण्यात आले.

पतसंस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष नुकतेच साजरे करण्यात आले. संस्थेने अल्पावधीत गरुड भरारी घेतली आहे. या संस्थेचे सभासद शैलेश बामणे यांना नुकताच पॅरालिसिसचा आजार झाला होता. बामणे यांना औषोधोपचाराकरीता सभासदांच्या कल्याण निधीतून आर्थिक सहायतेचा धनादेश संस्थेचे चेअरमन आनंद यादव, दिलीप जाधव, नरेश राजपूत, संदीप खरंगटे, उदय म्हशेलकर, अरुण प्रभाळे व संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, राजेंद्र जाधव यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

## पेणमध्ये वृक्षलागवड

**खरोशी :** महात्मा गांधी ग्रंथालय व वाचनालय पेण येथे कडुलिंब वृक्ष लागवड करण्यात आली. गेली काही वर्ष राज्यात सातत्याने होणारी दुष्काळी परिस्थिती तसेच, अवकाळी पाऊस यामुळे अन्नदाता बळीराजा संकटग्रस्त झाला आहे.

वसुंधरेचा समतोल राखण्यासाठी गांधी वाचनालयात १० जून रोजी कडुलिंब वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी अरविंद वनगे (अध्यक्ष), सुनील सत्वे (कार्याध्यक्ष) व नम्रता पाटील सहाय्यक ग्रंथपाल तसेच संत मुक्ताई विद्यार्थिनी पूजा साळी, काव्या गुप्ता उपस्थित होते.

# रायगड किल्ला परिसरात सह्याद्री प्रतिष्ठानची स्वच्छता मोहीम

**। खरोशी । वार्ताहर ।**

**अखंड हिंदुस्तानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राजाभिषेक दिनानिमित्त तसेच सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तानच्या १६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दुर्गराज रायगड येथे स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती.**

राज्याभिषेक सोहळ्यानंतर किल्ले रायगडावर प्रचंड मोठ्या प्रमाणावर कचरा साचतो. त्यामुळे गडाचे पावित्र्य टिकून राहत नाही. या मोहीमेच्या निमित्ताने सह्याद्रीच्या अनेक विभागांच्या दुर्गसेवकांनी मिळून रायगड किल्ला परिसर स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. रात्री गडावर व आसपासच्या परिसरात प्रचंड मोठ्या प्रमाणावर पाऊस पडली. तरीही सह्याद्रीच्या जवळपास २२५ दुर्गसेवकांनी सकाळी लवकर गडावर मोहीमेसाठी हजेरी लावली. त्या सर्व दुर्गसेवकांना तीन समूहात विभागण्यात आले होते. त्यांनी गडावरील जगदीश्वर मंदिर ते भवानी टोक परिसर, होळीचा माळ ते वाघ दरवाजा परिसर आणि शिरकाई देवी मंदिराच्या मागे अन्नछत्र (जिल्हा परिषद शेड), हत्ती तलाव परिसरातील कचरा, मोकळ्या पाणी बॉटल, प्लास्टीकचा कचरा मोठ्या प्रमाणावर गोळा केला.

मोहीमेतील दुर्देव हे की जगदीश्वर मंदिराच्या मागील बाजूस भवानी टोकाकडे जाताना त्या परिसरात रिकाम्या दारूच्या



बाटल्या सुद्धा सापडल्या. जवळपास अर्धे पोते भरेल एवढ्या दारूच्या बाटल्या गोळा करून त्या वाहून आणण्यात आल्या. रायगडसारख्या किल्ल्यावर असे प्रकार सुरु आहेत हि फार मोठी शोकांतिका आहे.

खरेतर राज्याभिषेक सोहळा झाल्यावर अनेक शिवप्रेमी व दुर्गप्रेमी संस्थांच्या सदस्यांनी रायगडावर येऊन गडावरचा कचरा गोळा केला होता. त्यामुळे गडमाथ्याच्या आजूबाजूला अवघड दऱ्यांमध्ये पडलेला कचरा गोळा करण्याची जबाबदारी सह्याद्रीच्या दुर्गसेवकांवर आली आणि ती जबाबदारी सर्वांनी चोख पार पाडली. एवढेच नाही तर गोळा केलेला कचरा पायरी मार्गाने प्रत्येक दुर्गसेवकाने गडाच्या खाली आणला आणि प्रशासनाच्या ताब्यात दिला.

अशा किती स्वच्छता मोहीमा करणार आणि किती कचरा साफ करणार! तरीही गड पूर्णपणे प्लास्टीकमुक्त होत नाही. प्रशासनाने गडावर प्लास्टीकबंदी केलीच पाहीजे. त्याशिवाय रायगडाचे पावित्र्य जपले जाणार नाही, अशी मागणी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तानने केली आहे.

# नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभाग उभारा

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात साधारण २०० बालके कुपोषित असून या बालकांसाठी कर्जत तालुक्यात बाल चिकित्सा केंद्र तसेच नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभाग आणि आदिवासी विभागात सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात यावेत, अशी मागणी उत्तम पालांडे यांनी राज्याच्या महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली आहे.

कर्जत तालुक्यात आदिवासी भाग मोठा असून या भागातील गरोदर महिलांच्या प्रसूतीच्या काळात बाळंतपण झाल्यावर नवजात बालके यांना अतिदक्षता विभागात ठेवण्याची वेळ येते. त्यावेळी कर्जत तालुक्यात कोणत्याही सरकारी रुग्णालयात बालकांसाठी अतिदक्षता विभाग नाही. त्यामुळे अतिदक्षता विभाग कार्यान्वित करण्यात यावा. तसेच आदिवासी भागातील विजेचा प्रश्न लक्षात घेवून सरकारने सौर ऊर्जा प्रकल्प राबवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

नागरीकरण वाढल्याचे लक्षात घेवून महावितरणचे येथे अतिरिक्त कर्मचारी तैनात करावेत.

निवडक

## नाले सफाईला सुरुवात

**पनवेल :** महानगर पालिकेमार्फत ठिकठिकाणी नाले सफाईची कामे सुरु आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सफाई करण्यात आली. येथे असणाऱ्या नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा काढण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने प्लास्टिकच्या बॉटल्स तसेच दारुच्या बाटल्या काढण्यात आल्या. याप्रसंगी स्वःत पालिका आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी एवढ्या मोठ्या प्रमाणावरील बाटल्या बघून थक्क झाले. नागरिकांनी रस्त्यावर कचरा न टाकता तो कचरा कुंडीतच टाकावा, असे आवाहन केले आहे.

## अज्ञाताचा मृतदेह

**महाड :** मुंबई-गोवा महामार्गावर दासगांव खिंडीलगत असलेल्या जंगल भागात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. मृतदेह पूर्णपणे सुकलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे त्याचा मृत्यु होवून अनेक दिवस लोटले असावेत अशी शक्यता आहे. मृत इसम अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचा आहे. त्याच्या अंगावर भगव्या रंगाचा टी शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स पॅट आहे. टी शर्टवर गुजराथी भाषेत बाल गोपाळ मित्र मंडळ, अडाजन असे लिहिले आहे.

## पाऊस बरसला

**मुरूड :** गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करायला लावणाऱ्या पावसाने अखेर मुरुड शहरासह तालुक्यात हजेरी लावली आहे. काल रात्रीपासून शहरात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसानी जोरदार हजेरी लावली असुन १५४ मि.मि. नोंद झाली आहे. पावसामुळे सर्वत्र पाणीतच पाणी झाले. मुरूडकरांना उकाड्यातून दिलासा मिळाला आहे. पाऊस पडल्याने शेतकरी राजा सुखावला असून शेतींच्या कामांना वेग आला आहे.

## रस्त्यांवर खड्डे

**अलिबाग :** तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारीत असणाऱ्या रस्त्यांवर खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. पावसाला सुरुवात होताच आता खड्ड्यांचा ताप नागरिकांना त्रासदायक ठरणार आहे. पावसाळ्यात कोणतेही रस्ते खोदता येणार नाहीत. अलिबाग बायपास मार्गावर काही कारणांसाठी खड्डे करण्यात आले होते. मात्र ते योग्य पध्दतीने न भरल्याने त्याचा त्रास वाहन चालकांना होत आहे.

## गढूळ पाण्याचा पुरवठा

**महाड :** तालुक्यात पावसाला सुरुवात झाल्यापासून शहराला गढूळ पाणीपुरवठा होत आहे. नगर परिषद विभागाकडून पाण्याचे शुध्दीकरण केले जात नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. मात्र, सुरुवातीचा पाऊस असल्याने डोंगरदऱ्यातून मातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात पाण्यामध्ये मिसळले आहे. त्यामुळे जलशुद्धीकरण करुनही पाण्याचा रंग काही प्रमाणात गढूळ असल्याचे नगर परिषदेने स्पष्ट केले आहे. पाणी उकळून व गाळून प्यावे, असे आवाहन केले आहे.

## अर्जुना नदीपात्रातील गाळ काढला

**रत्नागिरी :** पाटबंधारे विभागातर्फे कोंढेतड पूल ते मुंबई-गोवा महामार्गावरील अर्जुना नदीवरील पूल या पसिरातील अर्जुना नदीपात्रातील गाळाचा उपसा करण्यात आला आहे. महसूल विभाग, राजापूर नगरपालिकेचे सहकार्य आणि लोकसहभागातून नाम फाऊंडेशनच्या पुढाकाराने गतवर्षी अर्जुना-कोदवली नदीपात्रातील गाळ उपसा करण्यात आला होता. लाखो क्युबिक घनमीटर गाळ उपसा केल्याने नदीपात्राची खोली वाढली असून, रुंदावलेल्या पात्रामुळे दरवर्षीच्या तुलनेमध्ये गतवर्षी राजापूरला कमी प्रमाणात पुराची झळ पोहचली होती.

# आ. गोगावलेंना पुन्हा खुणावतंय मंत्रीपद

## खराब कामगिरी करणाऱ्या मंत्र्याचा पत्ता कट होणार

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्रातील मंत्रीमंडळ विस्ताराच्या हालचालींना वेग येत असल्याचे दिसून येते. मंत्रीमंडळात महायुतीमधील आमदारांना सामावून न घेतल्याने त्यांच्यामध्ये असंतोष खदखदत आहे. त्यामुळे त्यांना शांत करुनच विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी राज्यातील सरकारने केल्याचे बोलले जाते. कदाचित शेवटच्या ठरणाऱ्या मंत्रीमंडळाच्या विस्तारात महाडचे आमदार भरत गोगावले यांना स्थान मिळणार का याची अधिक उत्सुकता रायगडकरांना लागली आहे. मंत्रीमंडळ विस्ताराता खराब कामगिरी करणाऱ्याचा पत्ता कट होणार असल्याचीही जोरदार चर्चा आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात सुरुवातीला स्वतःच्या गळ्यात पडणारी मंत्रीपदाची माळ गोगावले यांनी दिपक केसरकर यांच्या गळ्यात घातली होती. याबाबत गोगावले यांनी जाहीरपणे बोलून दाखवले होते. त्यामुळे त्यांच्यावर पस्तावण्याची वेळ आली होती. त्यानंतरच्या मंत्रीमंडळात शिंदे गटातील आमदारांना विशेष करुन गोगावले यांना स्थान न देता राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील ११ आमदारांना मंत्रीपदाची शपथ देण्यात आली होती. त्यामुळे गोगावले यांची संधी हुकली होती. २७ जूनपासून राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. यापूर्वीच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार पार पाडण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने तिन्ही पक्षातील काही आमदारांची नाराजी दुर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तिन्ही पक्षातील काही आमदारांना मंत्रिपदाची लॉटरी लागणार आहे. तसेच नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. यात आमदार भरत गोगावले यांची वर्णी लागणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी सुनील तटकरे यांनी गोगावले यांना मंत्रीपद मिळणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळेच आता भरत गोगावले यांचे स्थान निश्चित मानले जात आहे.

# मासेमारी बंदीमुळे मासळीची आवक घटली

**। उरण । वार्ताहर ।**

खोल समुद्रातील पावसाळी ६१ दिवसाच्या मासेमारी बंदीच्या आदेशानंतर मासळीची आवक घटली आहे. त्यामुळे मात्र मासळीचे भाव चांगलेच कडाडले आहेत. जिल्ह्याभरातील मासळीचे लिलाव बंद होऊन कोट्यावधींची उलाढाल ठप्प झाली आहे. आता कोळी बांधवांनी आपापल्या बोटी किनारी आणून शाकारणी केली आहे.

करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड, खोपटा, वशेणी गव्हाण आदि ठिकाणी बंदरावर बोटी नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजाराहून अधिक मासेमारी नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी तर काही बिगर यांत्रिकी आहेत. ३१ मे हा मासेमारी हंगामाचा शेवटचा दिवस होता आता पुढील दोन महिने या बोटी किनाऱ्यावर विसावणार आहेत.



त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा एकदा मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात होणार आहे. बदलते हवामान, सांडपाण्यामुळे समुद्रात निर्माण होणारे प्रदूषण, जेली फिश अशा अनेक समस्यांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनात घट होते.

तरी देखील जिल्ह्यातील मच्छिमार सर्व संकटांवर मात करत मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. जून महिन्यात पावसामुळे उधाणा बरोबरच वारा, वादळ मोठ्या प्रमाणात येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकून पडण्याचा धोका अधिक असतो. अनेकांना जीव देखील गमवावा लागतो. तसेच पावसाळ्यात मासळी प्रजोत्पादन कालावधी असतो. त्यामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

दरम्यान, मासेमारी बंदीमुळे मच्छीमारांनी नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्ह्यासह करंजा व मोरा या बदरांवर बोटी नांगरण्यात आल्या असून काही ठिकाणी नांगरण्याचे काम आजही सुरू आहे.

# वरुणराजाच्या भरवशावर शेतकऱ्यांची पेरणीला सुरुवात



> **पावसाचे तुरळक अगमन झाल्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गाने पेरणी करण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी पेरणी सुरु असून काही ठिकाणी शेतकरी वर्ग पावसाच्या पाण्याच्या प्रतिक्षेत आहे. पेरणी केल्यावर पाऊस पडला नाही, तर राब नष्ट होतात म्हणून तालुक्याच्या ठिकाणी तुरळक भात पेरणीची कामे सुरु झाली आहेत.**
>
> **-अतिष म्हात्रे, शेतकरी**

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

पावसाचे तुरळक आगमन गेले तीन चार दिवस होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. पावसाने आपले अस्तित्व दाखविल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आपल्या जवळ असलेल्या बैलाच्या साह्याने पेरणी करण्यासाठी सुरुवात केली आहे.

पावसाळ्याचा हंगाम सुरु होत असल्याने शेतकरी पेरणीच्या जोरदार तयारीला लागलेला असल्याचे दृश्य तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे. परंतु यावर्षी पावसाचे आगमन कसे होणार या विचाराने हवामान खाते, पंचागकारांनी भविष्य वर्तविलेले असल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीस सुरुवात केली आहे. गेल्यावर्षी परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे अल्प प्रमाणात नुकसान झाले होते. तर काहीना मोठे नुकसान सहन करावे लागले. ते या वर्षी होवू नये, यासाठी वरुण राजावर विश्वास ठेवून पेरणी करण्यास सुरुवात झाली आहे.

रायगडातील शेतकऱ्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. भात पिकाबरोबर भाजीपाल्याची शेती केली जाते. शेती शिवाय पर्याय नसल्यामुळे शेतकरी वर्ग शेती करण्यासाठी सज्ज झाला आहे. पावसामुळे गुरांसाठी लागणाऱ्या चाऱ्यांचा प्रश्न सुटणार आहे. पावसामुळे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होणार आहे.

## वैश्य समाजातर्फे रविवारी गुणगौरव

**कणकवली :** वैश्य समाजातील दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा समाजातर्फे रविवारी दुपारी ३.३० वाजता येथील भालचंद्र महाराज संस्थानात सन्मान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला पालक व समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वैश्य समाज संघटनेचे अध्यक्ष महेंद्रकुमार मुरकर, सचिव गुरुनाथ पावसकर यांनी केले आहे. दहावी परीक्षेत ८० टक्के, बारावी परीक्षेत ७० टक्के गुण मिळविलेल्या, पदवी तसेच पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेची झेरॉक्स १५ जूनपूर्वी झेंडा चौकातील निवृत्ती धडाम यांच्या दुकानात जमा करावी. अधिक माहितीसाठी नीलम धडाम, विलास कोरगावकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# महावितरणच्या सहव्यवस्थापकीय संचालकांची सदिच्छा भेट

**। कल्याण । वार्ताहर ।**

महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे नवनियुक्त सहव्यवस्थापकीय संचालक रिचर्ड यानथन (भाप्रसे) यांनी कल्याण परिमंडल कार्यालयाला सोमवारी (दि.१०) सदिच्छा भेट दिली. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांनी त्यांचे स्वागत केले.

रिचर्ड यानथन यांनी सोमवारी सकाळी कोकण प्रादेशिक विभागाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदाचा पदभार स्वीकारला. मुख्य अभियंता औंढेकर यांच्या विनंतीनुसार त्यांनी कल्याण परिमंडल कार्यालयाला सदिच्छा भेट देत अधिकारी, अभियंत्यांशी संवाद साधला. वीज वितरण क्षेत्र त्यांच्यासाठी नवीन असल्याचे सांगत फिल्डवर उतरून शाखा कार्यालयापर्यंत पोहोचणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.





याप्रसंगी कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, पालघर मंडलाचे अधीक्षक अभियंता दिलीप खानंदे, स्थापत्य मंडलाचे अधीक्षक अभियंता विजय मोरे, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता महेश अंचिनमाने, सुरक्षा व अंमलबजावणी विभागाचे उपसंचालक सुमीत कुमार, माहिती तंत्रज्ञान विभागाचे उपमहाव्यवस्थापक योगेश खैरनार, मानव संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक धैर्यशील गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# रायगडसह कोकणात पुढील चार दिवस पावसाचे

## हवामान विभागाचा अंदाज

**रायगड :** मान्सून कोकणात दाखल झाल्यापासून पावसाची रिमझिम सुरुच आहे. राज्यातही पावसाने चांगलाच जोर धरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्यात पुढील चार दिवस पावसाची शक्यता कायम आहे. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यासह कोकणात पुढील ४ दिवस पावसाच्या सरी पाहायला मिळतील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

भारतीय हवामान विभागाने, ठाणे, मुंबई, पालघर, रायगड या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. या शिवाय, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांनाही पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर या जिल्ह्यांना आयएमडीने पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. याशिवाय राज्यभरात पुढील चार दिवस पावसाचा अंदाज कायम आहे.

विदर्भातील अनेक जिल्ह्यांनाही पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिय, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांमध्ये वादळी वारा आणि मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आयएमडीने विदर्भातील काही जिल्ह्यांना पुढील चार दिवसांसाठी यलो अलर्ट दिला आहे. तसेच, नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

**या जिल्ह्यात जोरदार पावसाच्या सरी कोसळणार**

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. काही भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, पुणे, पालघर, अहमदनगर, सातारा, धाराशिव, बीड, लातूर या जिल्ह्यात जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, ५०-६० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा आणि मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# उरणमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यात ग्रामीण भागात व उरण शहरातील भागात मोकाट भटकणाऱ्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या कुत्र्यांमुळे दहशतीचे वातावरण आहे. सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे कर्मचारी, कामगारांवर यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मोकाट कुत्रे हल्ले करत असल्याने उरण तालुयातील ग्रामीण भागात व उरण शहरात प्रवास करणे फराच धोकादायक झाले आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. उरण नगरपरिषद हद्दीमध्ये नगर परिषद प्रशासनाने पाहिजे तसे लक्ष न दिल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उरण नगर परिषद हद्दीतील वीर सावरकर मैदान (लाल मैदान) येथे काही दिवसांपूर्वी मोकाट कुत्र्यांनी एका व्यक्तीला हातावर चावून जखमी केले होते.

दरम्यान, उरण नगर परिषदेने सक्षम यंत्रणा राबवून कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे गरजेचे आहे.

# शिंदे गटाच्या नाराजीवर भाजपाचे प्रत्युत्तर

## श्रीरंग बारणेच्या नाराजीवर दरेकर बोलले

**। कर्जत । वार्ताहर ।**

महायुतीत राहून एकमेकांविषयी नाराजी व्यक्त करणे योग्य वाटत नाही. श्रीरंग बारणेंची नाराजी ना पक्षासाठी, ना अजित पवारांवर आणि ना शिंदेंवर. जर प्रतापराव जाधवांऐवजी बारणे राज्यमंत्री झाले असते तर त्यांनी त्यावर समाधानी असल्याचे वक्तव्य केले असते. परंतु मंत्री झाले नाही म्हणून कुठेतरी संताप, नाराजी काढली पाहिजे या भूमिकेतून श्रीरंग बारणेंनी वक्तव्य केले आहे. १०५ आमदार भाजपाचे असतानाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे झाले, देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले अशी प्रतिक्रिया भाजपा आमदार प्रविण दरेकर यांनी व्यक्त केली आहे.

प्रविण दरेकर म्हणाले की, आपण एका विचारधारेवर, हिंदुत्वाच्या भूमिकेवर एकनाथ शिंदेंसोबत युती केली. त्याचे सूतोवाच श्रीकांत शिंदे यांनीही केले आहे. जागांसाठी आपण एकत्र आलो नाही. तशीच भूमिका बारणे आणि सर्व संबंधितांनी घेतली पाहिजे.

महायुतीतील अंतर्गत गोष्टी जाहीरपणे न बोलता चार भिंतीत पक्षाच्या व्यासपीठावर बोलाव्यात अशी अपेक्षा सर्व महायुतीतील नेत्यांची, प्रवक्त्यांची आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आता बारणे बोलतायेत. त्यांच्या निवडणुकीत भाजपाच्या स्थानिक आमदारांनी आणि इतर कार्यकर्त्यांनी कशारितीने काम केले हेदेखील बारणेंना माहिती आहे. त्यामुळे आता बोललं तरी काय फरक पडतो. ५ वर्ष मी खासदार आहे अशा भूमिकेतून बोलणं योग्य नाही, असे दरेकरांनी सांगितले. तसेच मंत्री अनिल पाटील हे जबाबदार व्यक्ती आहेत. त्यांनीही अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य करणे योग्य वाटत नाही. महायुतीत वितुष्ट निर्माण होईल असे कुणी वक्तव्य करू नये अशा सूचना सगळ्या पक्षाच्या नेत्यांनी दिल्या पाहिजेत.

छगन भुजबळ, अनिल पाटील म्हणाले त्याप्रमाणे ४० जागांच्या पक्षाला ८० जागा दिल्या तर उद्या शिंदे यांच्या पक्षालाही ८०-९० जागा द्याव्या लागणार. हे सूत्र लावले तर आमच्या १०५ जागा आहेत. मग आम्हाला २१० जागा द्याव्या लागतील.

३७० चे विधिमंडळ नाही २८८ जागा आहेत. आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाच्या विधिमंडळ बैठकीत भाजपा कार्यकर्त्यांना सूचना दिल्यात तशीच अपेक्षा मित्रपक्षांकडून केली जाते, असेही प्रविण दरेकर यांनी स्पष्ट केले. निवडणूक निकालाचा स्ट्राइक रेट पाहून आम्हाला कॅबिनेट मंत्रिपद दिले पाहिजे होते, असे श्रीरंग बारणे खाते वाटपानंतर म्हणाले होते.



मुरुड-राजपुरी परिसरात पावसाला सुरूवात झाल्याने कोळी बांधवांनी आपल्या बोटी गावात आणल्या व पावसापासून सुरक्षित राहाव्यात यासाठी प्लास्टिकने आच्छादीत केल्या आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# जिल्ह्यातील दात्यांचे बांबोळीत रक्तदान

**सावंतवाडी :** गोवा-बांबोळी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी दुर्मिळ ओ निगेटिव्ह रक्तगटाच्या दात्यांची गरज होती. सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठानच्या चौघा सदस्यांनी त्वरित बांबोळी रक्तपेढीत जाऊन ओ निगेटिव्ह रक्तगटाचे रक्तदान केले.



यात वेंगुर्ले येथील सदानंद नलावडे, सावंतवाडी येथील अभय भिडे (१२ वे रक्तदान), वेंगुर्ले येथील रुपाली परब (दहावे रक्तदान), मालवण येथील एल्विरा फर्नांडिस (तिसरे रक्तदान) या रक्तदात्यांचा समावेश आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी गरजू मुलांची (हेल्पर) गरज आहे. चेंढरे गोंधळपाडा ९२७०६१४०७७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# हवामान बदलाचा रानमेव्याला फटका

## आदिवासी बांधव उपजीविकेच्या गर्तेत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**सध्याच्या हवामान बदलाचा विपरीत परिणाम यंदाच्या वर्षी रानमेव्यावर झाला आहे. यावर्षी अवकाळी पाऊस झाल्याने पिक कमी आले. याचा दुष्परिणाम जांभूळ, करवंद, राजण, अटूर्ण-पिटूर्णसह काजु या रानमेव्यावर झाला आहे. खेड्यातील शेतकरी व वाडयांतील आदिवासी हाताश झाले आहे. जिल्ह्यातील अनेक डोंगर भागात आदिवासी वाड्या आहेत.**

यातील अनेक आदिवासी बांधवाना खास असे उपजिवीकेचे साधन नाही. या आदिवासी वाड्यांतील बांधवांना आणि खेडयातील काही शेतकऱ्यांना ऊन्हाळयात जाम, जांभळ, करवंद, आंबे, काजु आदि जंगलातील रानमेवा विकून



घर खर्चाला दर वर्षी चांगला आधार होत असतो. मात्र, यावर्षी पिक कमी आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह आदिवासी बांधव काळजीत पडले आहेत. मागील वर्षी पाऊस चांगला झाला. त्यानंतर थंडीही चांगली पडली. फळ झाडांना मोहर येत असताना ढगाळलेले हवामान, पडणारे धुके, आणि आवकाळी पाऊस या खराब हवामानाचा झाडांना मोहोर येताना परिणाम झाला आहे. दरम्यान या वर्षी रानमेव्याचे पिक कमी आले आहे. तसेच जिल्हाभरातील बाजार पेठेत जांभुळ, काजु विक्रीसाठी येऊ लागले आहेत. जांभळाला किलोला सुमारे शंभराहून अधिक रूपये भाव मिळत असल्याचे सांगण्यात आले. थोड्या दिवसात जांभळांची आवक वाढेल असे सांगण्यात आले. फेब्रुवारी ते मे या चार महिन्यांत जंगलातील विविध फळेही बाजारात येत असतात. हा व्यवसाय रायगड जिल्ह्यातील आदिवासी महिला करीत असतात. या वर्षीही रानमेवा काजूगर, रांजणे, करवंदे, जांभळे, काजू बाजारात दाखल झाले आहेत. ओले काजूगर सातशे रुपये किलो तर काजूचा वाटा शंभर रुपये असा विकला जात आहे. रानमेवा आणि रानभाजीला ग्राहक आपली पसंती देत असल्याचे दिसते.

# कशेळे-खांडस रस्त्यावर अपघात

। नेरळ । वार्ताहर ।

कशेळे-खांडस रस्त्यावर पुणे पर्यटकांच्या वाहनास अपघात घडला. या अपघातात एक प्रवासी गंभीर जखमी असून, दोन किरकोळ जखमी झाले आहेत. समोरून आलेल्या दोन मोटारसायकलचा अंदाज न आल्याने रिक्षा चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि रिक्षा रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खड्ड्यात उलटली. जखमींना पनवेल एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कर्जत तालुका हा पर्यटन दृष्टीने फार्महाऊसचा तालुका म्हणून ओळख निर्माण झाली.विकेंडच्या काळात पुणे-मुंबई येथून पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. शनिवार ९ जून रोजी पुणे देहू रोड येथील प्रवासी पर्यटक कर्जत तालुक्यातील दुर्गम भागातील कशेळे खांडस याठिकाणी म्हणून फिरण्यासाठी आले होते. दरम्यान, पर्यटकांनी आणलेली ऑटो रिक्षा क्रमांक एमएच ४३ बीएफ ९३१६ या वाहनात चालक, तर दोन प्रवासी असे एकूण तीन मित्र होते. फार्महाऊसवर निघालेले हे पर्यटक कशेळे खांडस रस्त्यावरील अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स संस्थेच्या ज्ञानानुभव विद्यालय येथे आले असता रिक्षाला अपघात घडला. समोरून आलेल्या दोन मोटारसायकलचा वळणावर अंदाज न आल्याने वाहन चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि वाहन थेट रस्त्याच्या कडेला खड्ड्यात उलटून अपघात घडला. यामध्ये रिक्षाच्या मागील सीटवर बसलेल्या ५८ वर्षीय सुरेश दगडू वाघमारे या प्रवाशाच्या डोक्याला जबर मार लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. तर, चालक आणि अन्य दोन साथीदार हे अपघातात किरकोळ जखमी झाले होते.

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-७८/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. नासिर इस्माईल मुल्ला
वय ५४ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. मु.पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. नासिर इस्माईल मुल्ला यांची आई श्रीम. जमीलाबी सुलेमान मुल्ला - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जमीला इस्माईल मुल्ला-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०७/०६/१९५२ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २४/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई श्रीम. जमीला सुलेमान मुल्ला-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जमीला इस्माइल मुल्ला - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०७/०६/१९५२ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नासिर इस्माईल मुल्ला यांची आई श्रीम. जमीला सुलेमान मुल्ला-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. जमीला इस्माइल मुल्ला-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०७/०६/१९५२ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता.११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-८२/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रशिदा बेगम युसुफ गंग्रेकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. रशिदा बेगम अमीर अहमद राऊत
लग्नानंतरचे नाव
वय ५४ वर्षे, धंदा : गृहिणी, — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. रशिदा बेगम युसुफ गंग्रेकर- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशिदा बेगम अमीर अहमद राऊत-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १७/०७/१९७० रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १८/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १७/०७/१९७० रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रशिदा बेगम युसुफ गंग्रेकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशिदा बेगम अमीर अहमद राऊत-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १७/०७/१९७० रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. ११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.:-८०/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अमीर अहमद अब्दुल रहिमान राऊत
वय ६१ वर्षे, धंदा : शेती.
रा. मु. पो. मोर्बा, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.. — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अमीर अहमद अब्दुल रहिमान राऊत यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १९/०२/१९६३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १८/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. १९/०२/१९६३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अमीर अहमद अब्दुल रहिमान राऊत यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १२/०२/१९६३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. ११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-८१/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. यासीन अब्बास हर्णेकर
वय ४६ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. यासीन अब्बास हर्णेकर यांची आई श्रीम. रशिदा युनुस हर्णेकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशिदा अब्बास हर्णेकर- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०१/१९४८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १८/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई श्रीम. रशिदा युनुस हर्णेकर -लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशिदा अब्बास हर्णेकर- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०१/१९४८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. यासीन अब्बास हर्णेकर यांची आई श्रीम. रशिदा युनुस हर्णेकर -लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रशिदा अब्बास हर्णेकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०५/०१/१९४८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. ११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे मांडला, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. शैलेश अनंत नाईक, २. श्री. शैलेश पांडुरंग चव्हाण यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे मांडला, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला ता. मुरूड | १९७/१/१/अ | जिरायत ०-२४-७०<br>वरकस ०-१५-८०<br>पो.ख. ०-०६-५०<br>**एकुण क्षेत्र ०-४७-००** | ६.३५ |

वर नमूद मिळकतीमधील १. श्री. शैलेश अनंत नाईक, २.श्री.शैलेश पांडुरंग चव्हाण यांच्या मालकीचे क्षेत्र ०-३४-९० हे.आर., पो. ख. ०-०५-१० हे.आर., एकूण क्षेत्र ०-४०-०० हे. आर., आकार ५.४७ रू.पै.

दिनांक :- ११/०६/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) जयश्री काशिनाथ ठाकूर, २) राजेंद्र काशिनाथ ठाकूर, ३) अविनाश काशिनाथ ठाकूर, ४) आतिश सहदेव ठाकूर, ५) जागृती जयेंद्र म्हात्रे, ६) अंकुश सहदेव ठाकूर, ७) अलका मोहन म्हात्रे, ८) मयुरा सहदेव ठाकूर, ८) आशा अशोक गावंड, ९) किसन नारायण ठाकूर, १०) यमुनाबाई नारायण ठाकूर, ११) सुभाबाई नारायण ठाकूर, १२) धाकटीबाई नारायण ठाकूर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक/ उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार(रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वैजाळी, ता. अलिबाग | ७४ | ०१-११-५०<br>पो.ख. ०-१६-००<br>एकुण ०१-२७-५० | ०२.१९ |

सदर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, लिस पेंडन्स, वहिवाट, एफ.एस.आय, भूसंपादन दावा, हक्कनोंद, अपील, साठेकरार, बयाणा पावती, कोर्ट वादंग. या अन्य कोणत्याही तऱ्हेने हक्क वा सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १२/०६/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्येसमीर अनिल नेरुळकर (यापुढे 'मालक' असे उल्लेखित) यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकाकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असादावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगडयांचे कार्यक्षेत्र मधीलगाव-गाण तर्फे परहर, तालुका अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थितभूमापन क्रमांक व उपविभाग६/५/ब/८, एकूण क्षेत्र ००-२०- ०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. ०.६२/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १२/०६/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कामथ, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीच्या विद्यमान मालक प्रकाश शंकर काठे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कामथ ता. अलिबाग, | १८५ | जिरायत ०-०२-००<br>पो.ख. ०-०१-०० | ०.०३ |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, बारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ११/०६/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. मधुमती मारुती वरसोलकर, श्री. भगवान मारुती वरसोलकर व इतर दहा यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बागायत जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन कं. | क्षेत्र(हे.आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड | ३०५ | जि. ०-३५-००<br>ब. ०-४७-०० | १८.०० |
| | | एकूण ०-८२-०० | |

वरील नमूद बागायत मिळकतींपैकी क्षेत्र ०-२१-३० हे.आर.चौ.मी. (अंतर्गत भूखंड विभागणी प्रमाणे भूखंड क्र. १ ० १३ ८० हे.आर.चौ.मी व भूखंड क्र. २, ०-०७-५० हे.आर.चौ.मी. अशी एकूण ० - २१-३० हे.आर.चौ.मी) ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

अलिबाग,
दि. १२/०६/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics, Alibag Raigad

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ७९/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अकील हारून वांगरे
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती.
रा. दहिवली, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., पंचायत समिती माणगाव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अकील हारून वांगरे यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०९/१९६६ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. २६६/२०२४ ने दि. २३/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०९/१९६६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अकील हारून वांगरे यांचा जन्म मौजे दहिवली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०९/१९६६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. ११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-७७/२०२८

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. रिजवाना बशीर अहमद सोलकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. रिजवाना मोहमद मोहसीन धनसे
लग्नानंतरचे नाव
वय ४३ वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. रिजवाना बशीर अहमद सोलकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रिजवाना मोहमद मोहसीन धनसे-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १०/११/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला जावक क्र. १३५/२०२३-२४ ने दि. १६/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगाव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १०/११/१९८१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. रिजवाना बशीर अहमद सोलकर-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. रिजवाना मोहमद मोहसीन धनसे- लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. १०/११/१९८१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही /-
ता. १०/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१००/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. मोहम्मद मोहसीन मोहम्मद इस्हाक गंग्रेकर
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. मु. पो. रोहा,
ता. रोहा, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगाव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु श्री. मोहम्मद मोहसीन मोहम्मद इस्हाक गंग्रेकर यांची चुलती कै. जैनब सुलेमान गंग्रेकर ही दि. १८/०४/१९८६ रोजी मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे साम नेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २९/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची चुलती कै. जैनब सुलेमान गंग्रेकर ही दि. १८/०४/१९८६ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मोहम्मद मोहसीन मोहम्मद इस्हाक गंग्रेकर यांची चुलती कै. जैनब सुलेमान गंग्रेकर ही दि. १८/०४/१९८६ - रोजी मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : ११/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथीलखालील परिशिष्टात नमूदकेलेल्या जमिन मिळकतीश्री. गजानन कृष्णा म्हात्रे, राहणार आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिलाआहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील श्री. गजानन कृष्णा म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरीज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाटवा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिलत्यांचासदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आगरसुरे, ता.अलिबाग. | १०४ | ०-०५-००<br>०-०१-०० पो.ख.<br>०-०६-०० एकूण | ००-१० |
| आगरसुरे, ता.अलिबाग. | १०७ | ०-०२-००<br>०-०१-०० पो.ख.<br>०-०३-०० एकूण | ००-०५ |

अलिबाग,
दिनांक : ११/०६/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-तांबस ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र. हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गजानन विष्णू ठाकरे<br>लता गजानन ठाकरे | ४ | १/ ब | ०-५६-७० | ७=८७ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- १२/६/२०२४
मो. ७०५७८१७२००

**ॲड. भाऊसाहेब पुंजू मोरे**
पत्ता - स्वप्नदिप अपार्टमेंट,
सी विंग, फ्लॅट नं. २०८ डेक्कन जिमखाना,
रेल्वे स्टेशन जवळ कर्जत- रायगड
मो. ९५८८६४०९८०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मिलिंद जनार्दन बहाडकर, रा. जांभुळपाडा, ता. सुधागड आणि श्री. राजेश शरदचंद्र खेडेकर रा. खालापुर, ता. खालापुर यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २० | ०-१८-०० | ४.५० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलारा दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेवाडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १२/०६/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक अनिल गोमा पाटील आणि भावना अनिल पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१९१ | बिनशेती ४-५०-०० | ४५.०० |

वर नमुद मिळकत या नोटीस चा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहिवाट रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १०/०६/२०२४
मोबा. ९९२२७९८५२८

सही/-
**राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपागल्ली, पो. नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

निवडक

### पंजाबी बोलणं महागात

**न्युयॉर्क :** कॅनडा संघात भारतीय वंशाचे जास्त खेळाडू आहेत. ज्यामध्ये पंजाबी खेळाडूंची संख्या जास्त आहे आणि आश्चर्याची गोष्ट ही आहे की, त्यांना पंजाबी बोलणं सुद्धा खूप महागात पडत आहे. प्रत्येकाला त्याच्या भाषेत बोलण्याचा अधिकार आहे. परंतु, जेव्हा संघातील दोन किंवा अधिक खेळाडू असे करतात आणि इतर खेळाडूंना ती भाषा समजत नाही. त्यामुळे संघात अडचणीचे वातावरण निर्माण होत असते.

### पॅरिसमध्येही धोनीची क्रेझ

**पॅरिस :** आयपीएलचा हंगाम संपल्यानंतर भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी सुट्ट्यांचा आनंद घेत आहे. महेंद्रसिंह धोनी पॅरिसमध्ये फिरायला गेला आहे. तेथील एक फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहेत. महेंद्रसिंह धोनी पॅरिसमध्ये फिरायला गेला असताना तेथील एक चाहता धोनीला भेटला. त्याने धोनीचे चरणस्पर्श केले आणि तो खूप आनंदी झाल्याचा फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.

### सर्वात वयस्कर खेळाडू

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषक स्पर्धेत प्रथमच विक्रमी २० संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत अनेक तरुण खेळाडू खेळत असले तरी काही वयस्कर खेळाडूही आपली प्रतिभा दाखवत आहेत. असे ४ खेळाडू आहेत ज्यांची नावे फ्रँक न्सुबुगा-युगांडा (४३ वर्षे २८८ दिवस), नसीम खुशी-ओमान (४१ वर्षे, ३०५ दिवस), मोहम्मद नदीम-ओमान (४१ वर्षे २८१ दिवस), वेस्ली बॅरेसी-नेदरलँड्स (४० वर्षे ३९ दिवस) अशी असून त्यांचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त आहे.

### पाकिस्तान क्रिकेटमध्ये खळबळ

**लाहोर :** टी-२० विश्वचषकात पाकिस्तानच्या संघाची खराब कामगिरी सुरूच आहे. दरम्यान, माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने विश्वचषकानंतर संघातील गुपिते उघड करण्याचा दावा केला आहे. आफ्रिदीला त्याचा जावई शाहीनबद्दल प्रश्न विचारण्यात आला. यावर तो म्हणाला की, त्याला बऱ्याच गोष्टी माहित आहेत. मात्र, तो सध्या मोकळेपणाने बोलू शकत नाही. तो विश्वचषकानंतर यावर उघडपणे बोलेन. त्यांच्याच लोकांनी या संघाचा नाश केला असल्याचा दावाही आफ्रिदीने केला आहे.

### रिषभ पंतचे कौतुक

**न्युयॉर्क :** मृत्यूच्या दाढेतून तू परत आला आहेस. त्यामुळे मैदानावर कितीही आव्हानात्मक परिस्थिती असली तरी तू त्यावर मात करणार याची खात्री आहे. तू शूरवीर आहेस, अशा शब्दात रवी शास्त्री यांनी पंतचे कौतुक केले. सामन्यात सर्वोत्तम क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूचा मेडल देऊन गौरव करण्याची प्रथा एकदिवसीय विश्वकरंडक स्पर्धे पासून सुरू झाली आहे. रविवारी पाकविरुद्धच्या सामन्यात पंतने चपळाईपूर्ण खेळाने तीन झेल पकडले. त्यामुळे तो सर्वोत्तम खेळाडू ठरला.

# दक्षिण आफ्रिकेची बांगलादेशवर मात

## सुपर-आठमधील प्रवेश निश्चित

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात सुपर-आठच्या शर्यतीत अनेक मोठ्या संघांना धक्का बसला आहे. ज्यामध्ये पाकिस्तान, बांगलादेश, इंग्लंड, श्रीलंका या संघाचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिका संघाने सोमवारी टी-२० विश्वकरंडकातील सलग तिसरा विजय मिळवला. श्रीलंका व नेदरलँड्स या संघांना पराभूत केल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने बांगलादेश संघावर चार धावांनी मात केली. याचसह दक्षिण आफ्रिकेने सुपर-आठ फेरीमधील प्रवेश जवळपास निश्चित केला आहे.

दक्षिण आफ्रिका संघाकडून मिळालेल्या ११४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या बांगलादेशची सुरुवात निराशाजनक झाली. कागिसो रबाडा याने तानझिद हसनला (९) बाद केले. त्यानंतर नजमुल शांतो (१४), लिटन दास (९) व शाकीब हसन (३) या स्टार खेळाडूंना अपयश आले. तौहीद हृदोय (३७) व महमुदूलाह (२०) यांनी विजयासाठी प्रयत्न केले; पण रबाडा (२/१९), ॲनरिक नॉर्खिया (२/१७) व केशव महाराज (३/२७) यांनी चांगली गोलंदाजी करीत बांगलादेशला सात बाद १०९ धावांपर्यंत रोखले.

दरम्यान, याआधी दक्षिण आफ्रिका संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तनझिम साकीब याच्या प्रभावी गोलंदाजीमुळे दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांची भंबेरी उडाली. रीझा हेनड्रिक्स (०), क्विंटॉन डी कॉक (१८), ट्रिस्टन स्टब्स (०) या तीन प्रमुख फलंदाजांना त्याने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. तस्कीन अहमद याने कर्णधार एडन मार्करमला (२) बाद केले. आफ्रिकेची पाचव्या षटकांत चार बाद २३ धावा अशी बिकट अवस्था झाली. हेनरिक क्लासेन व डेव्हिड मिलर या जोडीने ७९ धावांची भागीदारी करीत बांगलादेशच्या गोलंदाजांचे आव्हान परतवून लावले. दक्षिण आफ्रिकेने शंभरी पार केल्यानंतर तस्कीन अहमदच्या गोलंदाजीवर आक्रमक फटका खेळण्याच्या प्रयत्नात क्लासेन (४६) त्रिफळाचीत झाला. यानंतर लगेचच रिशाद होसेन याने मिलरला २९ धावांवर बाद करीत मोठा अडसर दूर केला. दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत सहा बाद ११३ धावा करता आल्या. बांगलादेशकडून तनझिम साकीब याने १८ धावा देत तीन फलंदाज बाद केले.



**रबाडाच्या षटकाने फिरवले चित्र**

**वास्तविक, बांगलादेशला शेवटच्या ३ षटकात विजयासाठी २० धावांची गरज होती. पण १८व्या षटकात कागिसो रबाडा गोलंदाजी करायला आला, ज्याने षटकाच्या पहिल्या चेंडूवर ३७ धावांवर असलेला फलंदाज तौहीदला बाद केले. तसेच, या षटकात फक्त दोन धावा दिल्या. त्यामुळे बांगलादेशी फलंदाजांवर दबाव आला आणि मोठे फटके खेळण्याच्या नादात बांगलादेशचे फलंदाज झटपट बाद झाले.**

# पुन्हा होणार भारत-पाक सामना?



**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**


टी-२० विश्वचषकामध्ये पाकिस्तान संघाची कामगिरी खुपच खराब राहिली आहे. त्याने आपल्या प्रवासाची सुरुवात यूएसए विरुद्ध खेळून केली, ज्यामध्ये बाबर आझमच्या संघाला सुपर ओव्हरमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. त्याचवेळी, रविवारी बाबर आझमच्या संघाला स्पर्धेतील १९व्या सामन्यात भारताकडून ६ धावांनी दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. सलग दोन सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागल्यानंतर पाकिस्तानवर आता स्पर्धेतून बाहेर होण्याचा धोका आहे.

सुपर-८च्या भारत-पाकिस्तान यांच्यातील सामन्यात उत्साहाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्या, ज्याचा क्रिकेटप्रेमींनी आनंद लुटला. मात्र, या दोन संघांमधील आणखी एक सामना या स्पर्धेत होऊ शकतो. जवळपास हे शक्य आहे पण त्यासाठी काही गोष्टी पाकिस्तानच्या बाजूने जाणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे यावेळी या स्पर्धेत २० संघ सहभागी झाले असून त्यांची ४ गटात विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक गटात ५-५ संघ आहेत. गृप स्टेज संपल्यानंतर केवळ ८ संघ दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरतील. याचा अर्थ प्रत्येक गटातून दोनच संघ पुढच्या टप्प्यात प्रवेश करतील. दुसरी फेरी गाठण्यासाठी पाकिस्तानला आगामी दोन सामन्यांमध्ये कॅनडा आणि आयर्लंडविरुद्ध मोठे विजय मिळवावे लागतील जेणेकरून त्यांचा नेट रन रेट चांगला होईल. त्याचबरोबर भारतीय संघ आणि आयर्लंड यांनाही आपापल्या सामन्यात यूएसएचा पराभव केला पाहिजे. यानंतर जर पाकिस्तानचा नेट रन रेट अमेरिकेपेक्षा चांगला असेल तर त्यांना सुपर-८ मध्ये प्रवेश मिळेल.

# पाकिस्तानच्या खेळाडूंना शत्रूची गरज नाही

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात रविवारी झालेल्या भारत आणि पाकिस्तानच्या सामन्यात भारताचा सहा धावांनी विजय झाला. पाकिस्तान बाजी मारेल असे वाटत असताना भारतीय संघाच्या वेगवान गोलंदाजांनी चोख भूमिका बजावली. पाकिस्तानच्या या पराभवानंतर मोठ्या प्रमाणात त्यांच्यावर टीका केली जात आहे.





पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी वेगवान गोलंदाज वसीम अक्रमने निशाणा साधला आहे. पाकिस्तानच्या संघातील खेळाडू गेल्या १० वर्षांपासून क्रिकेट खेळत आहे. त्यामुळे मी त्यांना काही शिकवू शकत नाही. जसप्रीत बुमराह विकेट घेण्यासाठीच गोलंदाजीसाठी आला होता, हे मोहम्मद रिझवानला माहिती नाही का? बुमहार गोलंदाजीसाठी आल्यानंतर रिझवानने सावध राहायला हवे होते. मात्र, मोठा फटका मारायला गेला आणि तो बाद झाला, इफ्तिखार अहमदने देखील हेच केले, असं वसीम अक्रम म्हणाला.

पाकिस्तानच्या संघातील खेळाडू एकमेकांसोबत जास्त बोलत नाही. हे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आहे आणि तुम्ही तुमच्या देशासाठी खेळत आहात. या खेळाडूंना घरी बसवण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानच्या खेळाडूंना शत्रूची गरज भासत नाही. कारण की ते स्वत:च त्यांचे शत्रू आहेत. भारताला पराभूत करण्यासाठी पाकिस्तानी फलंदाजांकडे खूप वेळ होता पण त्यांना ते जमले नाही. पाकिस्तानी संघाकडे कोणती रणनीतीच नसल्याने पराभव स्वीकारावा लागला, असेही वसीम अक्रमने सांगितले.

# कोल्हापूर टस्कर्सचा दुसरा विजय

**। गहुंजे । प्रतिनिधी ।**

कर्णधार राहुल त्रिपाठी (६३) याने केलेल्या अर्धशतकी खेळीसह श्रेयस चव्हाण (४/१४) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर कोल्हापूर टस्कर्स संघाने रत्नागिरी जेट्स संघाचा २ धावांनी पराभव केला. कोल्हापूर टस्कर्सचा हा दुसरा विजय ठरला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर सुरु झालेल्या स्पर्धेत रत्नागिरी जेट्स संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रत्नागिरीच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत कर्णधाराने घेतलेला निर्णय सार्थ ठरविला.




हर्ष संघवी (१), अंकित बावणे (२) यांना झटपट बाद करून सलामीची जोडी लवकर तंबूत पाठवली. दिव्यांग हिंगणेकरने अंकित बावणेला, तर प्रदीप दाढेने हर्ष संघवीला झेल बाद केले. त्यानंतर कर्णधार राहुल व सिद्धार्थ यांनी तिसऱ्या विकेटसाठी ३६ चेंडूत ५० धावांची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. पण याचवेळी कर्णधार अझीम काझीने राहुल त्रिपाठीला ६३ धावांवर झेल बाद केले. पाठोपाठ सिद्धार्थ म्हात्रे धावबाद झाला. त्यानंतर योगेश डोंगरे (२८), अनिकेत पोरवाल(१०), श्रीकांत मुंढे (१६) यांनी धावा काढून संघाला २० षटकात ७ बाद १६९ धावांचे आव्हान उभे केले.

१७० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या रत्नागिरी संघाला २० षटकात ७ बाद १६७ धावाच करता आल्या. कोल्हापूरच्या श्रेयसने १४ धावात ४ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याला श्रीकांत मुंढे (१/२५), मनोज यादव(१/४२) यांनी प्रत्येकी एक गडी बाद करून साथ दिली.

# आयसीसीच्या नियमामुळे बांगलादेशचा घात

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात दक्षिण अफ्रिका आणि बांगलादेश यांच्या सामन्यादरम्यान १७व्या षटकाचा दुसरा चेंडू महमुदुल्लाहच्या पॅडला लागल्यानंतर सीमारेषेच्या बाहेर गेला. दक्षिण आफ्रिकेने अपील केले आणि अंपायरने आऊट दिला. महमुदुल्लाहने डीआरएस घेतला आणि तो नाबाद राहिला. पण त्यानंतरही त्याला ही चौकार दिला नाही. आयसीसीच्या या नियमामुळे बांगलादेशने हा सामना गमावला. हा नियम नसता तर सामना टाय झाला असता आणि नंतर सुपर ओव्हर खेळावी लागली असती.

# हरभजनचा फिरला दांडपट्टा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानी संघाला शेवटच्या षटकात विजयासाठी १८ धावांची गरज होती. त्यावेळी अर्शदीप सिंगने गोलंदाजीची जबाबदारी घेतली. अर्शदीप गोलंदाजी करत असताना कामरान अकमल पाकिस्तानच्या एका न्यूजमध्ये भारत-पाकिस्तान सामन्याची चर्चा करत होता. यावेळी त्याने अर्शदीप आणि शीख समुदायाबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली. तो म्हणाला बघा, अर्शदीप सिंगला शेवटची ओव्हर करायची आहे. काहीही होऊ शकते कारण... बारा वाजले आहेत. यानंतर तो जोरजोरात हसताना दिसत आहे. या कामरानच्या



वक्तव्यावर हरभजन सिंगने सडकून टीका केली आहे. यावर हरभजनने पोस्ट करत लिहिले, लाज वाटली पाहिजे कामरान अकमल. घाणेरडे तोंड उघडण्यापूर्वी शिखांचा इतिहास जाणून घ्या. आम्ही शीखांनी तुमच्या माता-भगिनींना वाचवले, जेव्हा आक्रमणकर्त्यांनी त्यांचे अपहरण केले होते, तेव्हा वेळ १२ वाजलेली होती. थोडी तरी लाज वाटू दे. थोडी कृतज्ञता बाळगा.

# पेलोटा वास्का शिबीर, स्पर्धेचे आयेजन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

जम्मू काश्मीर येथील श्रीनगरमध्ये पहिल्या राष्ट्रीय पेलोटा वास्का (फ्रंटबॉल) राष्ट्रीय शिबीर व स्पर्धेचे आयेजन दि.१ ते ५ जून दरम्यान करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरासाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक स्पेनवरून ईनाकी व अर्जेंटिनावरून मार्टिन हे आले होते. यावेळी देशातून १८ राज्यातील एकूण १५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये महाराष्ट्रातील संस्कृती घरत हिने रौप्यपदक तर आरिश बावडेकर याने कांस्यपदक पटकावल आहे.



यावेळी या शिबिरासाठी महाराष्ट्रातील स्वप्नील आदुरकर (ठाणे), संस्कृती घरत (रायगड), संदेश भोजकर (कोल्हापूर), यश सरनाईक (कोल्हापूर), शुभम महानकाळे (कोल्हापूर), आरिष बावडेकर (सातारा), साहिल गुर्जर (सातारा), विनायक चोथे (पुणे), कुणाल भुसारे (ठाणे), दिशांत भोईर (ठाणे), हर्ष साळुंखे (पुणे) अशा १२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. पेलोटा वास्का या खेळाला आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेची मान्यता असून भारतामधे प्रथमच या खेळाचे शिबीर व स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यावेळी खेळाडूंना राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष मोहम्मद इक्बाल व उपाध्यक्ष महेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल?

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाला १२ जून रोजी सह-यजमान यूएसए विरुद्ध तिसरा लीग सामना खेळायचा आहे. टी-२०च्या इतिहासात ही पहिलीच वेळ असेल जेव्हा दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध मैदानात उतरतील. सध्या दोन्ही संघांनी आपले पहिले दोन सामने जिंकून ४-४ गुण मिळवले आहेत आणि नेट रन रेटच्या आधारे भारत पहिल्या क्रमांकावर आहे तर यूएसए दुसऱ्या क्रमांकावर आहे. जर दोन्ही देशांमधील हा सामना पावसामुळे रद्द झाला तर दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळेल आणि अशा स्थितीत पाकिस्तानचा संघ सुपर ८ च्या शर्यतीतून बाहेर पडेल. पण या सामन्यात भारतीय संघ जिंकण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे रोहित शर्मा भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल करू शकतो. भारताने जर काही बदल केलेच तर कदाचित खराब फॉर्म असलेल्या शिवम दुबेला प्लेइंग इलेव्हनमधून वगळले जाऊ शकते. जर दुबे संघाबाहेर गेला तर सॅमसन किंवा यशस्वी यांच्यापैकी एकाला खेळण्याची संधी मिळू शकते.

## न्यूझीलंडवरही टांगती तलवार

# गतविजेत्या साहेबांना बाहेरचा रस्ता

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या टी-२० विश्वचषकाचा रोमांच शिगेला पोहोचला आहे. यावेळी विश्वचषकाध्ये २० संघ खेळत आहेत. त्याचबरोबर सुपर-८ सामन्यांपूर्वी अनेक छोट्या संघांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांना चकित केले आहे. विश्वचषकाध्ये आतापर्यंत २१ सामने खेळले गेले आहेत. यानंतर एक संघ सुपर-८ शर्यतीतून बाहेर पडला आहे, तर आता चॅम्पियन्स इंग्लंड, श्रीलंका, पाकिस्तानसह १० संघ बाहेर



पडण्याचा धोका आहे.

आतापर्यंत विश्वचषकामध्ये इंग्लंडने दोन व न्यूझीलंडने एकच सामना खेळला आहे. इंग्लंड 'ब' गटात चौथ्या स्थानावर असून न्यूझीलंड 'क' गटात शेवटच्या स्थानावर आहे. तसेच, पाकिस्तान संघाने दोन सामने खेळले असून दोन्ही सामन्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. सध्या पाकिस्तान 'अ' गटात चौथ्या स्थानावर आहे. याशिवाय युगांडा, नामिबिया, नेपाळ, आयर्लंड, पापुआ न्यू गिनी, श्रीलंका आणि कॅनडा या संघांनाही सुपर-८ शर्यतीतून बाहेर पडण्याचा धोका आहे.

### गतविजेता इंग्लंड संघ बाहेर?

**यंदाच्या विश्वचषकामध्ये पाऊस अनेक संघांसाठी खलनायक ठरला आहे. इंग्लंडचा पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यानंतर इंग्लंड पुढचा सामना ऑस्ट्रेलियाकडून हरला. आता गतविजेत्याला सुपर-८ शर्यतीतून बाहेर पडण्याचा धोका आहे. इंग्लंडने २ सामने खेळले असून ते 'ब' गटात एका गुणासह चौथ्या स्थानावर आहे.**

# फिफा विश्वकरंडकाची पात्रता फेरी

## भारतीय संघ छेत्रीविना उतरणार मैदानात

**। दोहा । वृत्तसंस्था ।**

दिग्गज खेळाडू सुनील छेत्री याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा केल्यानंतर भारतीय फुटबॉल संघ प्रथमच मैदानात उतरणार आहे. भारतीय संघ आशियाई खंडातील बलाढ्य कतारशी दोन हात करणार आहे.

भारतीय फुटबॉल संघाला तिसऱ्या फेरीत पोहोचण्यासाठी कतारविरुद्ध विजय मिळवणे आवश्यक आहे. 'अ' गटातून कतारने १३ गुणांसह पुढील फेरी गाठली आहे. भारताने कतारविरुद्धच्या लढतीत विजय मिळवल्यास त्यांचाही मार्ग मोकळा होणार आहे. मात्र, ही लढत अनिर्णित राहिल्यास त्यांना अफगाणिस्तान-कुवेत या लढतीतील निकालाची



प्रतीक्षा करावी लागणार आहे. यांच्यामधील लढतही अनिर्णित राहिल्यास सरस गोलफरकाच्या जोरावर भारतीय संघाला आगेकूच करता येणार आहे. मात्र, भारतीय संघ पराभूत झाला अन् अफगाणिस्तानच्या संघाने विजय मिळवला, तर भारताचे आव्हान तिथेच संपुष्टात येणार आहे.

### सुनीलनंतर कोण?

**भारतीय फुटबॉल संघाला एक प्रश्न गेले दशकभर सतावत आहे. स्ट्रायकर सुनील छेत्रीनंतर कोण? सुनील छेत्री निवृत्त झाल्यानंतरही भारताचा अव्वल दर्जाचा आक्रमक फळीतील खेळाडू सापडलेला नाही. रहीम अली याच्याकडून म्हणावी तशी कामगिरी झालेली नाही. मानवीर सिंग, विक्रम प्रताप सिंग, डेव्हिड एल. याचा आक्रमक फळीत समावेश केला जातो, पण त्यांनाही अद्याप चमक दाखवता आलेली नाही. भारतीय संघाला लवकरात लवकर सुनील छेत्रीचा उत्तराधिकारी शोधावा लागणार आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)